वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।१३
सहामाही ३ " " ०।८
सालअखेर " ७ " १।०८
किरकोळ अंकास........................०।४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरें खेपेस ..........०।

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly............3 " 8 as
Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over10...4 as
Repetition per line3as

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIV — AKOLA MONDAY NOVEMBER 3 1890 — NO 43

वर्ष २४ — अकोला सोमवार तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १८९० इ० — अंक ४३

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

### सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे खवेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फलरसाच्या

### गोळ्या.

यापसून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तात्काळच नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदू ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा


### कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. याने सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरिता डा० एन. व्ही. छत्रे याचे दवाखान्यात वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गौतमराव कराव, मुंबई.

### सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर
आणि कंपनी
मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन
तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी
अर्ध्या आण्याचें तिकिट
पाठविल्यास मिळेल.

### जाहिरात.

संस्थान सोंडूर जिल्हा बल्लारी इलाखा मद्रास येथें श्रीकार्तिक स्वामीचे महास्थान आहे. तेथें येत्या कार्तिक महिन्यांत शुद्ध पोर्णिमेस महायात्रा भरणार आहे तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोईकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शनटिकीट | १ |
| बारावर्षाचे आंतील मुलास दर्शनटिकिट | १ |

कार्तिक शुद्ध १३ पासून तो कार्तिक शुद्ध १५ पावेतों श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर टिकीटें विकत मिळतील. ब्राह्मणा वाचून इतर लोकांनीं अभिषेक पादस्पर्श वगैरे ब्राह्मण द्वारा करवावें. तारीख १० माहे आक्टोबर सन १८९० इसवी.

सही
सही भीमराव पोळ म्यानेजर
श्रीकार्तिक स्वामी देवस्थान संवस्थान
सोंडूर.
जिल्हा बल्लारी.

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन वद्य ७ शके १८१२.

## रेलवे कमिशन बसवा.

फॅक्टरी कमिशन बसवून सरकारनें तेथील मजूर लोकांवर कामाचा बोजा कसा लादला जातो ह्याची चौकशी सुरू केली आहे. परंतु रेलवे नोकरांच्या स्थितीकडे सरकारचें लक्ष जाऊं नये ही मोठी खेदाची गोष्ट होय. मोठमोठाल्या कारखान्यांतून काम करणाऱ्या लोकांपेक्षां रेलवे नोकरांनां अधिक त्रास सोसावा लागतो, इतर कारखाने खाजगी संस्था समजल्या जातात. परंतु रेलवे सरकारी खात्यापैकीं एक खातें आहे असा पुष्कळ लोकांचा समज झालेला असतो, व तसा समज होण्यास अधारही आहेत. रेलवे कंपन्यास सरकारची हमी असते व त्याबद्दल कंपन्यांस आपल्या नफ्यापैकीं बराच मोठा भाग सरकारास द्यावा लागतो व तो भाग योग्य रीतीनें मिळावा ह्मणून किंवा हमी दिलेली असते ह्मणून सरकार त्या कंपन्यास कोणतेही फेरबदल करण्यांच्या अगोदर आपली संमति द्यावयास लाविते. रेलवे पोलीस, रेलवे कायदे कानु, इत्यादि सर्व कांहीं सरकारी धाटावर व्यवस्था असून हो रेलवे नोकरांची पृथ्वीतील दुसऱ्या सर्व नोकरांपेक्षां दुःखप्रद स्थिति असावी व 'काय करावें पोट तर जळलें पाहिजे!' इत्यादि हृदयद्रावक उद्गार त्या लोकांच्या तोंडांतून ऐकूं यावें ही गोष्ट रेलवे कंपन्यास व त्यांतही मुख्यत्वें सरकारास मोठी लांछनस्पद होय!

म्यॅंचेस्टर येथील व्यापारी लोकांच्या डोळ्यांत सलणारी हिंदुस्थानांतील व्यापाराची भरभराट आणि त्या व्यापाऱ्यांच्या पोटावर पाय येतोसा पाहून भूतदयेचे घोडे पुढें ढकलणाऱ्या पाद्री लोकांची ओरड ह्या दोन कारणांनीं सरकारास हें कमिशन बसवावें लागलें ही गोष्ट सर्व श्रुत आहेच. मजूर लोकांची कुरकुर नसतांही हें कमिशन कसें बसविण्यांत आलें आणि मजूर लोकांसारख्या गरीब लोकांची दाद सरकारापर्यंत कशी पोंहोचली? अशा शंका काढणारांस देशबांधवाचें कल्याण करण्याचा कृतसंकल्प, हेंच उत्तर समाधानकारक होईल. हल्लीं बसलेल्या कमिशनाचे चौकशी करण्याचे जे मुद्दे आहेत त्यापैकीं मजुरांचें काम करण्याचे तास आणि सुट्टीचे दिवस यांच्यांत फेरबदल होण्याची अवश्यकता आहे कीं काय ह्यांचा खल होणार आहे. सरकारास रेलवेच्या नोकराविषयीं कळवळा येऊन ह्याच बाबतींत चवकशीचें कमिशन बसवणें फार अगत्याचे आहे.

जें होईल तें पाहून व सहन करून स्वस्थ बसणें ह्मणजे आपली संमत्ति दर्शविणें होय असा इंग्रज लोकांचा तरी समज आहे असें पुष्कळ उदाहरणावरून दिसून येतें तेव्हां आपल्याला होत असलेल्या दुःखाची असह्यता दाखविण्यास आकाश पाताळ एक केल्या खेरीज आपली दाद कोणीही घेणार नाहीं ही गोष्ट खरी आहे. आणि म्हणूनच रेलवे नोकरांनीं स्वस्थ न बसतां आपलीं दुःखें कंपनीपुढें अथवा सरकारापुढें जाऊन विदीत करावीत व त्यांची दया संपादन करावी हा राजमार्ग त्यांस खुला आहे. असें कित्येकांचें ह्मणणें आहे व पुष्कळ अंशी तें योग्यही आहे परंतु त्या लोकांची स्थिति कशी आहे व त्या लोकांचे अंगांत आपले हाल सरकारांस कळविण्याचा योग्यता आहे किंवा नाहीं इकडे लक्ष गेलें पाहिजे. मजूर लोकांकरितां कमिशन बसण्यास जसें मॅंचेस्टरचे व पाद्री लोक मुळ कारण झाले त्याच प्रमाणें रेलवे नोकरांची स्थिति लक्षांत आणून कोणी तरी जिव्हाईतानें उचल केली पाहिजे कारण, त्या लोकांकडून आपल्या अन्न दात्यांच्या उलट वागणें होणार नाहीं असें आह्मांस वाटतें. एकतर त्या लोकांचे ज्ञान तुटपुंजेच असतें; शिवाय त्यांचे अधिकाऱ्यांचें चुकी केल्याबद्दलचे नियम फार कडक असतात. व त्यांची अम्मल बजावणी ही तंतोतंत होत असते असें शोधांतीं कळून येतें. तेव्हां अशा कडक अमला खालीं असतानां कमजास्त चळवळ करणें ह्मणजे अन्नास दुरावणेंच आहे. 'विहित्तवीत्वानवा आणि स्वाभाविक नियमा विरुद्ध कामें करून हाडांची काडें ही दोन्ही जप्पत हत्यारें जवळ असल्यावर कोणी दारार्शी उभें राहू न देतील किंवा नाहीं ह्याचा संशय अशा पंचाईतींत पडणाऱ्या लोकां कडून कांहीं होणें नाहीं. परंतु अशा शोचनीय स्थितींत असलेल्या कैक लाख लोकांची दाद लावण्याचे उपाय योजना करणें आमचे कर्तव्य कर्म आहे.

आपल्या नोकरांस मुख्या देणें रेल कंपन्यास हितावह होणार नाहीं परंतु कामकरून घेण्याचे तासाची संख्या कमी होणें फार जरूर आहे. संध्याकाळीं साहावाजल्या पासून सकाळीं सहा वाजें पर्यंत मुद्दाम पाठन लावितां काम करण्याचे किती जड जात असेल ह्याची कल्पना होणें दुर्घट कठीण. बरें जें काम करावयाचे त्याची जबाबदारी तरी केवढी आहे! जरा चूक झाली तर शेकडो प्राण्यांच्या जिवाची आहुता होण्याचा प्रसंग! इतकें नाजूक काम असून ही सर्व रात्रभर जागणाऱ्या एकट्या मनुष्यावर तें लादलें जातें तेव्हां त्या कंपन्यांची धन्य समजली पाहिजे. प्रत्यक्ष इश्वरानें ठरऊन दिलेल्या काळाचा दुरुपयोग न करण्यांत यावा ह्मणून सर्व रात्रभर जागणाऱ्या स्टेशनमास्तर आणि पोरटर ह्या लोकांच्या काम करण्याच्या तासाची संख्या बाराची आठावर आणावयास सरकारनें रेलवे कंपन्यास भाग पाडावें त्याच प्रमाणें सर्व वर्षभर अविश्रांत काम करणाऱ्या लोकांना रजा मिळण्याची व्यवस्था आहे त्या पेक्षां अधिक सवलतीची करविण्यांस लावणें जरूर आहे. तसेंच नवीन निघत असलेल्या रेलवे कंपन्यानीं कंजूषपणा करण्याची तर सीमाच करून सोडिली आहे तिकडे ही सरकारचे लक्ष जावें. इतकें मुद्दे महत्वाचे आहेत आणि ह्यांची चवकशी कमिशन मार्फत होण्याची सरकार लवकर तजवीज करील अशी आह्मांस पूर्ण आशा आहे.

( ४१ अंकावरून पुढें चालूं. )

आमची अशी मनापासून इच्छा व प्रार्थना आहे कीं, व मला वाटतें आपणा सर्वांचा कृतनिश्चय असला पाहिजे, कीं ज्यांच्या माथ्यावर हिंदुस्थानचा राज्यकारभार सुयंत्र चालविण्याचा बोजा आहे व जे आपणासर्वांस तेथील राज्यव्यवस्थेबद्दल जबाबदार आहेत त्यांनीं अशा ऐतिहासिक कालानुरूप व तसेंच अशा काळीं जें त्यांचें कर्तव्यकर्म आहे त्या कर्तव्य कर्मांची जबाबदारी मनांत आणून, तेथील राज्यव्यवस्था चालविली पाहिजे. कुलीन स्त्रियानो व सभ्य गृहस्थहो, अशा प्रकारची राज्यक्रांती– याच राज्यक्रांतीच्या आधारावर मला जें कांहीं मागणें आहे तें मागावयाचे आहे– ही राज्यक्रांती फार प्रबल चोहोंकडे पसरलेली नाना तऱ्हेनें डोळे फाडून दृग्गोचर होणारी कीं जिच्याकडेस लक्ष न देणारे लोकांचें सुद्धां लक्ष लागून गेलें आहे. आमच्यावर राज्य करणारे लोक या लोकांचे संबंधानें मी अती नम्रतेनें बोलतो– यांचें लक्ष जनसमूहामध्यें ज्या कांहीं घडामोडी होतात याजकडेस मुळींच पोहोंचत नाहीं. परंतु ह्या सर्वांस बाध आणणारे एक गृहस्थ निघाले आहेत. ते गृहस्थ वायव्य प्रांताचे लेफ्टनेंट गव्हरनर साहेब सर आकलंड कालवीन हे होत. त्यांना ह्या वाटत असलेल्या राज्यक्रांतीचें स्वरूप इतकें स्पष्ट दिसून आलें कीं त्यानीं आपल्या धर्माच्या धर्म पुस्तकांतील गर्भित अर्थाच्या शद्बाचा उपयोग करून तिचें दिग्दर्शन केलें आहे. त्यांनीं सन १८८४ इसवी सालीं एक पुस्तक प्रसिद्ध केलें त्यामध्यें तें असें लिहितात कीं, " उघड्या अफाट मैदान दृष्टांतील सुकून पडलेल्या हाडामध्यें जीव आला आहे. " असें ह्मणून तें पुढें असें विचारतात कीं " हिंदुस्थानामध्यें जिकडेतिकडे पुढें पाऊल ठेवणें सुरूं असून आपणच मात्र स्तब्ध बसून रहावें काय? बदललेल्या काळानुरूप आपण आपली राज्य व्यवस्था सुधारूं नये काय?" हाच प्रश्न त्यांनीं घातला आहे व तोच प्रश्न मीही आपणास घालण्यास इच्छितो. व त्याचा जबाब आपण आपले अंतःकरणा पासून मला द्यावा. तो जबाब जो द्याल तो आपणासारख्या बडे लोकांच्या योग्यतेनुरूप, तसेंच आपल्या राज्यव्यवस्थेबद्दल जी आख्याइका चालत आलेली आहे तिला अनुरूप असली पाहिजे. [ आनंदाची टाळी ]. कुलीन स्त्रियानों व सभ्य गृहस्थ हो हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभा, जिनें मला येथें पाठविलें आहे, हीच अशा प्रकारची हिंदुस्थानांतील स्थिती झाली आहे याचें चिन्ह आहे. एका मोठ्या राज्य धुरंधरमंत्र्यानें भाकित केल्या प्रमाणें ही स्थिती घडून आली व त्याचेंच शद्ब खरें झालें. ही जो स्थिती प्राप्त झाली हें इंग्रज सरकारच्या राज्यास मोठें भूषण आहे व इंग्रज सरकारला आपण करीत असलेल्या श्रमाचे फळ मिळालें असें ह्मटलें पाहिजे. इंग्रज लोकांमध्यें कांहीं गृहस्थांस ही राज्यक्रांती भयप्रद व धोक्याची वाटते. अश्या प्रकारचे लोक इंग्रज लोकांमध्यें सांपडणें ह्मणजे मला अमळ आश्चर्याची गोष्ट वाटते. मलावाटतें इंग्लंडामध्यें अशा प्रकारचे लोक सांपडणार नाहींत परंतु आमच्या हिंदुस्थानामध्यें अशा प्रकारचे लोक फार सांपडतील. तथापि आह्मांला ह्या वाटत असलल्या राज्यक्रांतीचे संबंधानें आपल्या ब्रिटनातील लोकांचे मनावर कांहीं भलताच ग्रह होईल अशी भीति बाळगण्याचें आह्मांस कांहींच कारण दिसत नाहीं. परवाचेंच दिवशीं बंडलेकांच्या सभेमध्यें या विषयाचे संबंधानें वादविवाद झाला. व मी आभार पूर्वक त्या वादविवादामध्यें लार्ड नार्थब्रूक लार्ड किंबरले व लार्ड रिपन या बडे लोकांनीं राष्ट्रीय सभेच्या संबंधानें जे कांहीं करुणापर भाषण केलें तें भाषण आपण कृपाकरून पहावें अशी मी आपणांस विनंती करितो. ( आनंदाचीटाळी ) परंतु यांच्या पेक्षांही मोठेच एक गृहस्थ माझे पाठबळास आहेत. मिस्तर ग्ल्याडस्टन साहेब [ आनंदाचीटाळी ] यानीं गेल्या वर्षाचें मागल्या वर्षीं लाईम हैास येथें एक सभा भरली होती तेथें मिस्तर ग्ल्याडस्टन साहेबांनीं हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेच्या संबंधानें जें कांहीं भाषण केलें त्या भाषणाचा टणत्कार हल्लींच्या घटकेस माझ्या कानांत झणाणत आहे ते ह्मणाले " बाबांनो ह्या मोठ्या राष्ट्राचे भरभराटीं कडे आपण लक्ष नदेणें व तिला क्षुद्रदृष्टीनें पाहणें ही नीट व बरी गोष्ट नाहीं. " हल्लीं जिवंत असलेलें मंत्र्यामध्यें उत्तम गणलेल्या मंत्र्याचे अशा प्रकारचे ह्मणणें आहे. ( आनंदाचेटाळी ) व माझी अशी पूर्ण खात्री आहे कीं त्यांच्या ह्मणण्या प्रमाणेंच पुष्कळ इंग्रज लोकांचें ह्मणणें असेल.

---

बालविवाहा सारख्या भयंकर चालीमध्यें सुधारणा करणें व होणें अगदीं अवश्यक आहे असें पुष्कळ व्याख्यानकारांनीं बोलून दाखविलें आहे व त्या संबधानें वर्तमान पत्रांतून ही बरीच उहापोह झाली आहे. नवीन, जुने, शिक्षित, आशिक्षित वगैरे सर्वांचें जरी मत घेतलें तरी ही सुधारणा होणें इष्ट आहे असें ठरेल. परंतु ती कशी व कोणी करावयाची या विचारांतच काय तो बराच काल आजपर्यंत गेला आहे व आणखी जाईल. व असें होतां होतां शेवटीं परिणाम मात्र असा होईल कीं सरकार या संबंधानें कायदा करून जबरीनें ही गोष्ट करावयास लावील व आजपर्यंत केलेल्या आपल्या सर्व श्रमाचे श्रय सरकारास जाईल तर या बद्दल चांगला विचार करून दुसऱ्यानें जबरीनें आपल्या घशांत औषधीं ओतण्या पूर्वी तें आपलें आपणच घेतली असता बरें होईल असें आह्मांस वाटतें. ह्या बालविवाहाच्या चाली बद्दल डा.पीची फिल्सेन या विदुषी बाईनीं मुंबई येथील प्रार्थना समाजापुढें फार सुरेख व्याख्यान दिलें आहे तें इतकें सुरेख आहे कीं त्याचें अक्षरशः मनन केलें असतां वाईट होणार नाहीं. सदर्हू व्याख्यान इंग्रेजीत असल्यामुळें आमच्या वाचका करितां त्यांतील थेवढेच तितकी माहिती आह्मा देतों :-

डा. पीची फिल्सन ह्मणाल्या :- सभ्यगृहस्थहो! माझ्या व्यवसायाच्या संबधानें तुमच्या गृहास्थितीचें जें मला ज्ञान प्राप्तझालें आहे त्यावरून माझी खात्री झाली आहे कीं तुमच्या मधून बऱ्याच गोष्टीं घेण्यासारख्या आहेत. त्यांत मुख्यत्वें करून तुमची धर्म पद्धती विशेष अनुकरणीय आहे. तुमची आपल्या धर्मावर फार श्रद्धा आहे व त्याच्या खरेपणा बद्दल तुह्माला बिलकूल शंका सुद्धा वाटत नाहीं व इतके जरी आहे तरी परकीयाच्या धर्माबद्दल औदासिन्य ठेऊन, आजपर्यंत तुह्मीं या संबधानेंकधीच परकीयांचा छळ केला नाहीं. ही गोष्ट तुम्हाला फार भूषणास्पद आहे व इतरांनीं तुमच्या पासून ती अवश्य शिकली पाहिजे.

परंतु ज्या संबंधानें मी आज दोन शद्ब बोलणार आहे तो बालविवाहाची चाल फार रानटी असून ती पासून तुमचें फार नुकसान होत आहे. व तुह्मीं सर्वांनी ती नाहींशी करण्या करितां एक दिलानें झटलें पाहिजे व तसें जर तुम्ही करीत नाहीं तर या भयंकर चालीचे दुष्ट परिणाम तुम्हाला आणखी किती पिढ्या भोगावे लागतील हें मला समजत नाहीं तुमच्यापैकीं बहुतेक विद्वानांचें मत माझ्या मताप्रमाणें आहे हें मी समजून आहे तथापि त्याबद्दल तुम्हाला तपशिलवार माहिती सांगितली असतां वाईट न होतां कांहीं मदत केल्या सारखें होईल. वैद्यशास्त्र दृष्ट्या ह्या चालीमुळें तुमच्या नवीन पिढीवर काय काय दुष्ठ परिणाम होण्याचा संभव आहे हें तुम्हाला समजून द्यावें असा माझा विचार आहे इकडे येण्यापूर्वी मी पुस्तकांतून वाचलें होतें कीं इकडील मुलींचीं लग्नें लहानपणींच होतात व इकडील मुली इंग्लंडांतील मुलीपेक्षां लवकर वयांत येतात. परंतु अनुभवावरून मला असें कळून आलें आहे कीं इकडील १९ वर्षांची मुलगी आमच्या कडील ११ वर्षांच्या मुलींची थोडी बहुत बरोबरी करूं शकेल. इकडील पुस्तककार वयांतयेणें व ऋतुस्नांत होणें हें एकच समजत असत परंतु हें चुकीचें आहे असें तुम्हाला समजून येईल. तुमच्या ह्मणण्याप्रमाणें वयांत येण्याची व्याख्या कबूल केली तरी वयांत येण्यापूर्वीं एखाद्या मुग्ध व अल्लड पोरीचें कृत्यत्व हरण करणें हें आमच्या मतें काय परंतु सर्व सुधारलेल्या जगाचें मतें इतकें भयंकर व राक्षसी आहे कीं त्याबद्दल स्पष्टपणें सांगितलें असतां तुमचें न्हृदय फाटल्यावांचून राहणार नाहीं. फुलमनेची न्हृदयद्रावक हकीकत ऐकिल्यापासून संमत्तीच्या कायद्यांत फेरफार करावा असें तुह्मापैकीं बहुतेकांस वाटूं लागलें आहे परंतु ह्या सारखी व आणखी दुसरीं शेंकडों उदाहरणें जितकीं मीं पाहिलें आहेत तितकीं जर तुम्ही पाहिली असती तर ह्या पशुतुल्य आचरणाबद्दल पिनलकोड मध्यें सांगितलेली सक्तमजुरीची शिक्षा कांहींच नाहीं असें तुह्मांस वाटले असतें. ह्या बाबतींत सरकारानें हात घालावा म्हणून तुमची खटपट आहे म्हणून मला माहीत आहे परंतु हें पशुवत आचरण बंद करण्यास तुमची बहिष्काराची शिक्षा बस होणार नाहीं काय? मला वाटतें तुम्ही जर एक दिलानें व हिंमतीनें वागाल तर तुमचे कार्य सहज होण्या सारखें आहे. अशा विषयांधपणानें जिच्या जन्माचें मातेरें होतें व जिच्या संसाराचा भंडवाडा होतो त्या स्त्रीस आपल्या ह्या मदोन्मत्त पतीचा तिटकारा आल्यावांचून राहवत असेल असें वाटतें काय? अशा पतीच्या पतीच्या वर्तनापासून प्रेम उत्पन्न व्हावें ह्मणून जो तुमचा विवाहाचा मुख्य हेतु आहे तो कसा कायम राहत असेल? सभ्य गृहस्थहो ह्या प्रकारापासून तुमच्या धर्मावर केवढा कलंक येऊंपाहत आहे याचा तुम्ही विचार करा व सद्गुणावर जर तुमची प्रीति असेल व अब्रूची जर तुम्हाला चाड असेल तर हा कलंक काढून टाकण्या विषयीं खटपट करा. तुमच्या म्हणण्या प्रमाणें रजोदर्शन होणें हें स्त्रीचे वयांत आल्या बद्दलचें मुख्य दर्शक होय तर मग थेडगांवांतील मोकळ्या हवेंत वाढलेली घट्टी कट्टा मुलगी शहरांतील कोंडलेल्या अकरा वर्षाचे मुलीहून शरीर दृष्ट्या अधीक घट्टाकट्टा असून ही ऋतुस्नांत झाली नसतें याचें कारण काय? अकरा वर्षाची मुलगी पूर्ण वाढीची असून तेरा वर्षांची मुलगी पूर्ण वाढीची नाहीं असें म्हणतां येईल काय? असें जर नाहीं तर तुमची समज चुकीची आहे हें सहज आहे. रजोदर्शन हें स्त्रिच्या वाढीवर जितके अवलंबून आहे त्या पेक्षां बऱ्याच अधीक अंशानें तें हवा पाण्यावर व भोवतालच्या स्थितीवर अवलंबून आहे. येवढ्याच कारणा वरून शहरांतील अशक्त मुली खेड्यांतील मुली पेक्षा लवकर ऋतुस्नांत होतात. दुसरी गोष्ठ तुमच्या सहज लक्षांत येण्या सारखी आहे कीं ऋतु प्राप्त होण्याचा काल व गर्भधारणाचा काल यांत बरेंच अंतर असतें. या वरून ऋतु प्राप्त होणें व गर्भ धारणार्थ योग्य होणें ह्या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत यांत कांहीं संशय नाहीं.

शरीराची पूर्ण वाढ होण्या पूर्वीं स्त्रीशीं संभोग झाला असतां काय काय परिणाम होतात हें पहा. पहिली गोष्ट? स्त्री या मुळें वंध्या होते तुमच्या मध्यें संतती असणें सर्वांनुमतें जरी अत्यंत अवश्य वाटत आहे तरी ह्याला विपरीत अशा मार्गाचें तुम्ही आचरण करितां. ( पुढें चालू )

---

# The Berar Samachar

MONDAY, NOVEMBER 3, 1890

## MR. HUME ON "THE PEOPLE'S CAUSE."

Mr. Hume, the father and originator of the Indian National Congress, delivered a vigorous and impressive speech on the 11th, of the last month at Ayr in Scotland before a radical audience. The speech deals with the views and position of the two well known political parties in England, and we Indians, though not directly concerned with the fate and lot of the parties, shall derive a lesson of considerable importance by somewhat a reflex light—if we be permitted to use such an expression in connection with our house affairs. We purpose, therefore, to publish the whole speech *in extenso* for the benefit of our readers. We wish our readers will read and study the speech very carefully, and see if it is not the very position and views of the two parties that will compel our people at no distant date to throw in their lot with the radical party. The speech runs as follows.

My dear friends, I have such an atrocious cold and am generally so seedy to-night, that I had quite made up my mind to forego the pleasure of addressing you; and, listening to the exhaustive and eloquent review by our honoured guest Mr. Wilson, of the present aspect of our political horizon, I felt doubly resolved not to intrude upon you with any dull prosings of my own. But there has been something magnetic in our contact; it has stirred my heart to be once more face to face with a gathering like this of staunch and earnest Radicals, for in India, whence I come, almost all our countrymen, in fact almost all Europeans are rabid Tories, and the men, who, like my friend Sir William Wedderbu[rn]

and myself, still cling to the political creed of our fathers, are few and far between, and in the eyes of the rest of the European community, *Anathema maranatha*, most vile and hateful, and it really *is* refreshing to find myself once more the member of a large assembly, not one man amongst whom, I venture to say, will set me down as necessarily either a rogue or fool, simply because, like my father before, I am a Radical!

Then, too, the kindly reception which you accorded, when it was first mentioned to my dear father's honoured name, has cheered me alike on public and private grounds, and so I have made up my mind, at all risks, at the risk of wearying you, at the risk of aggravating my already bad sore throat, to speak to you now, as I may have no other chance of addressing you, those words which, as I have sat here look ing in your faces and thinking over the position of affairs in this constituency, have come into my heart to say.

First of all I would say, you do well my friends to cherish with gratitude and affection the names and memories of earnest, unselfish, consistent workers in the people's cause, such as my father was-- men whose heads had one sole thought, whose hearts were filled with one single desire, whose lives had one sole object, and that how they could best serve the cause and advance the interests of the people.

We are all Radicals here now, and no man, practically, can let or hinder us seriously; for, thanks, to the labours and self devotion of the reformers of the past generation, Britain at any rate— (alas, that we cannot yet say the same of our sister Isle) -- has verily become, as the great English Poet sings:

"A land where, girt by friends or foes,
A man may speak the thing he wills."

But when, early in this century, my father commenced his work, matters were widely different; only a very few years previously, Muir and Palmer, our Scottish Martyrs, had been transported, virtually, though not technically as I am aware, for preaching those doctrines in regard to the rights of subjects and the duties of rulers, and the supremacy of the claims of the masses over the privileges of the classes, which constituted the basis of his political creed, and I have heard him tell, how often in those early days he was privately threatened with prosecution and how year after year efforts were made to close his mouth— now by intimidation, now by the offer of a peerage, and other similar bribes. But

"He was one who never turned his back
but strode breast forwards;
"Never doubted clouds would break,
"Never dreamed, tho' Right *were* worsted, Wrong could triumph,
"Held, we fall to rise; are baffled to fight better; sleep, to wake."

And I for one doubt not, that, though he now sleeps, he shall yet wake renewed and reinvigorated to labour once more -- as he ever laboured here-- though on a higher platform, for the good of God's creatures and the honour of our great Lord and Master.

Yes! let these be our watch-words: The good of man and the glory of God. For, guided by these alone can we hope to navigate safely and to the profit of our brethren the stormy waters of political life.

For politics rightly considered are not as so many people now-a-days seem to think a mere game played to make or mar the fleeting earthly reputation of this or that prominent statesman— a mere game played just for the honour and glory, or possibly amusement of a few hundreds of professional players, but an unselfish and persistent effort to secure the amelioration of the lot of our less fortunate fellows to raise and comfort the down-trodden, the oppressed, and the suffering, to root out and redress those evils and those wrongs still entailed upon so many of our brethren, by grievous defects in our system of administration, to ensure to every child born into the country, the amplest opportunity for the fullest development-physical mental, moral-- of which it is capable & to every adult the freest and fairest field for the exercise of all those talents and capacities which it has thus developed; in a word, to secure the greatest possible happiness for the greatest possible number of our people, and to secure this not by the spasmodic and often blundering efforts of a handful of highly cultivated individuals who arrogate to themselves a sort of divine right to rule us, but by the steadfast unremitting action of the combined knowledge and wisdom of the entire community.

This is the Radical's creed; this is the signification of the oft-repeated, but none the less pregnant and sole stirring aphorism, "Government of the people, for the people, by the people."

This, too, is what we mean when we say that the only invariably safe rule of action for every Government, in all times and in all places, is embodied in the dogma: "Trust the People."

This is wherein we differ from our political opponents, of whom none the less I would ever speak in kindly terms. Resolved to oppose them, tooth and nail, to the last drop of my blood, the last hour of my life, by every fair and honourable means, I none the less fully recognize that, misled by unhealthy training in youth and blinded by hereditory bias and class prejudice, they may be as sincerely convinced of the correctness of their views as we are of the righteousness of ours. But be this as it may, this, I say, is wherein we differ from them: they don't want the people to govern, it is they who want to do all the governing, they do *not* trust the people. That old tory, grand poet as he was, Horace, exactly preached their creed when he said, " I hate the outside public, and I burn with indignation when they presume to offer opinions on subjects which they ought to leave to the wisdom of their betters. "

(To be continued.)

---

The Naib Tehasildars in Berar seem to have no responsible work upon their shoulders. The only thing they have got to do is the care of the treasury. But in some of the Talukas this work also is kept by the Tehasildars under their entire control. Practically, then, the Naib's place is a sinecure. It would be much better if some kind of responsible work is entrusted to them. Petty revenue cases or petty criminal cases can be safely put into their hands and their time may be thus utilized both to the benefit of the public and the benefit of the Naibs themselves. In the Presidency of Bombay the Aval karkuns exactly similar in respect of position and pay to the Naib Tehsildars in this province, are given magisterial powers of the third class. The work of the Tehsildar is thus made easy and he gets time to exercise his superintendence over the Taluk entrusted to his charge. Indian villages need inspection from officers and if this is neglected much mischief results to the whole population in general. It is eminently necessary that each village in a Taluk should be visited once a year at least by the Tehsildar or by by his Naib. Even a conscientions Tehsildar is not able to visit all the villages during the course of a whole year. It takes him nearly 4 or 5 years of his official career in a Taluk to have visited most of the villages in his jurisdiction. This is simply because he is overworked. He has to do multifarious duties and if part of his work could be given over to his assistant he would be relieved and would have time to see the villages and enforce sanitation as well as other necessary improvements there. Public sanitation is almost unknown in India. Rules of this science have to be enforced there. This can be best done by the exercise of supervision which Tehsildars can do and which the Educational Department with all its machinary is not able to effect. The Naib also can do some of this business which his head the Tehsildar may entrust him with. It is essentially necessary then to exact some responsible work from the Naib here as they do in almost all provinces in India.

---

## THE AGE OF CONSENT.

The women of India intend to address a memorial to Her Majesty the Empress of India on the subject of the age of consent. They propose that the limit of age which is at present 10 under Penal Code to make the consent of a female a valid one may be raised to 14 to protect them from husbands and strangers. The question whether the raising of the limit of age will have any immediate and visible effect upon marriageable age as it at present obtains in the Hindu system of marriage is not touched by the proposed memorial. But we have no doubt that the raising of the age for purposes of the Penal Code will have a deterrent effect upon the minds of the parents or guardians of young persons, when they set about the business of marrying young folks. So if the prayer of the memorial be complied with, it will though indirectly exercise its influence in raising the marriageable age among Hindus. Sir W. Hunter in his letter to the London Times proposes that the age of consent for purposes of the Penal Code may be raised from ten to twelve. In this proposal of Sir William the Bombay, Bengal Madras people seem to acquiesce. They pledge in addition to this acquiescence to promote in the families over which they possess some sort of influence, a raising of marriageable age.

The party of the conservatives seems to have simply dwindled into insignificance. The last social conference held at Bombay have also addressed a memorial to the Government of India embodying largely the proposal of Sir William Hunter in England. In this state of things it would be a very wise step on the part of the supreme Government to move in the matter and legislate once for all either in agreement with the women of India's memorial or with the views of the last Social Congress in Bombay.

Dr. Peachy Phipson a Lady medical practitioner in Bombay addressed a few days ago the Hindus of Bombay on the same subject. The burthen of the same was that marriageable age should be raised and then only the physical development of the Hindu race is possible.

Turn to any quarter you please, and you meet with nothing but the same voice speaking through many tongues that the marriageable age of the girls should be raised. In fact you might say that the burning question of the day is the age question and those responsible for the well being of the subject ought to strike hard while it is hot.

---

## PRIMARY EDUCATION.

The importance of primary education of the poor people is best seen when it is taken into account what the Paris people do for their poor in regard to this matter. They spend nearly 10000000 one crore of rupees annually for the maintenance of school, boarding of the pupils and medical attendance upon the sick children of the school-going age. The average attendance of scholars in schools is 92 per 100. Instruction in all kinds is imparted there. Higher education may be left to take care of itself. For those whom it has benefitted will take pretty good care to keep it going, but the greatest difficulty is experienced when primary education is to be kept going. The people for whose benefit it is intended do not possess means enough to keep the department going; while it is of the utmost importance that these poor people should be educated to protect them from being the victims of the cunning and the rogue. And it becomes the bounden duty of all municipalities to set apart a large fund out of their incomes for the maintenance of institutions intended for the instruction of the poor. The care and anxiety bestowed in this matter by the citizens of Paris is exemplary and noble and this fact may be remembered with advantage by those whose duty it is to look after the education of the poor.

---

## वऱ्हाड.

मे० रेसिडेंत सा० उमरावती येथें येतील तेव्हां त्यांस मानपत्र द्यावें असा उमरावती म्यु० कमेटीनें ठराव केला आहे या कामाचे व्यवस्थेसाठीं एक सब कमेटी नेमण्यांत आली आहे.

रा. रा. विनायकराव भाटवडेकर माजी डे. ए. इं. यवतमाळ हे जगन्नाथाचे यात्रेस गेलें होते तिकडे त्यांची अधिक प्रकृती बिघडून त्यास देवाज्ञा झाल्याचें कळतें.

रा० रा० बळवंतरावजी वैद्य सब डे० ए० इ० यांना उमरावती जिल्ह्यांतील कांहीं व अकोल्या जिल्ह्यांतील कांहीं शाळां तपासा व्या लागत असत. आतां फक्त अकोलें जिल्ह्यांतीलच काम त्यांचे कडे ठेवलें असून उमरावती जिल्ह्यांतील कांहीं शाळा तपासण्या साठीं रा० रा० गोविंदरावजी चिकाटे हे० मा० बाळापूर यांस सब डे० ए० इ० नेमलें आहे.

थोडीदिवसांपूर्वी येथें चिफ कान्स्टेबलांची परीक्षा झाली तींत कवायतींत नापास झाल्या मुळें रा० रा० यशवंतराव काळे यांस ५० रु० चे जागेवरून ४० रु० चे जाग्यावर घतले व रा० रा० मार्तंडराव चि० का० मंगरूळ दस्तगीर, नरसिंगराव चि० का० खोलपूर व सफरूद्दीन चि० का० वणी यांना हेडकान्स्टेबल केलें असें कळतें.

---

## जाहिरात.

मी खालीं सही करणार सर्वत्र लोकांस कळवीत आहे कीं आमचा मुखत्यार इस्मायेल शेट हे आकोल्यास कांहीं कामाकरितां ता० २७ आक्टोबर सन १८९० रोजीं गेले होते परत आकोल्यास स्टेशनावर येतांना धाजपाशीं असलेले मुखत्यारपत्र व एक जनरल स्टांप किंमत रुपये २० विसचा कोरा आमचे नांवचा असे चामड्याचे थयलींत असलेले रस्त्यांत पडले आहेत ज्यास सांपडतील त्यांनीं आह्मांस आणून दिल्यास दोन रुपये इनाम दिला जाईल ता० १-११-९० इ०

(सही)

महंमदअली तयबअली दुकान खामगांव.

---

## वर्तमानसार

आमच्या शेताची सुधारणा व्हावी हा आमच्या सरकारची इच्छा मनापासून आहे असें जरी मानून चाललें तरी ती सुधारण्या बद्दल जो मार्ग काढण्यांत येतो तो अती विलक्षण असून आह्मां शेतकऱ्यांस तर तो ऐकून हसूच येतें. १८०५ सालापासून अशी सुधारणा व्हावी अशी सरकारची इच्छा व त्यावेळेपासून आमच्या सरकारच्या मठ्ठ डोक्यांत ज शिरलें आहे कीं शेतीची सुधारणा विलायतेहून त्या कामांत हुषार असणाऱ्या गोऱ्या कामदारांस आणल्यावाचून व्हावयाची नाहीं ते अजून कायम च! परवा सिमल्यास याच संबंधानें विचार करण्यासाठीं एक कान्फरन्स भरलें त्यावेळींही एक गोरा कामदार आणण्याचेंच ठरलें तेव्हां या हट्टी स्वभावाला व मूर्खपणाला काय ह्मणावें? बुभुक्षितापुढें मृत्तीकेनें भरलेलीं ताटें ठेवण्यापैकींच हा प्रकार आहे! योग्य सुधारणे कडे आमच्या सरकारचें लक्ष केव्हां जाईल तें जावो. शेत जमिनीवर धारा वाढविण्यांत येत आहे व जंगलास कुलुप लावण्यांत येऊन काय रडणार? संत्तपुढें शहाणपणा नाहीं. ह्मणतात तें याचाच!।

खंबायतेस नुकताच जो दंगा झाला व त्याचमुळें दिवाण मि. लाड यांस राजीनामा देणें भाग झालें त्या संबंधानें मि. लाड यांणी एकपत्र प्रसिद्ध केलें असून त्यावरून त्या संस्थानची खरी स्थिति समजण्याचा मार्ग असल्यामुळें ती माहिती आह्मी याखालीं देतो:- ( १ ) संस्थानचें उत्पन्न १० लाख नसून ६ लाख आहे. ( २ ) संस्थानास ६ किंवा ७ लाख कर्ज नसून सुमारें ९० हजार रुपये कर्ज आहे. हें कर्ज सरकार व नबाबाची बहीण यांचे आहे. ( ३ ) जमीन वसूल १,२०,००० रुपये अजून वसूल होणें आहे. ( ४ ) कांहीं कामदारांचे पगार चार चार आठ आठ महिन्याचें देणें आहेत असें जें सांगण्यांत येत आहे त्याबद्दल लवकर तजवीज व्हावी ह्मणून तालुक्या निहाय तलाठी लोकांस हुकुम सोडले आहेत कीं, जसजसें पैसे वसूल होतील तसतसा पगार द्यावा व ही रीत आज बरेंच वर्षे चालू आहे; या पगारासंबंधीं काय तजवीज केली आहे असें नव्या दिवाणीनें सरक्युलरही काढलें आहे. ही माहिती येईपर्यंत फक्त कामदारांचा पगार मिळाला नाहीं हें ह्मणणें चुकीचें आहे ( ५ ) नुकताच दंगा झाल्यामुळें पगार देतां आला नाहीं. ( ६ ) खजिन्यांत शिलक थोडी होती याबद्दल एवढेंच ह्मणणें आहे कीं, दंगा चालू असल्यामुळें कोणत्याही प्रकारचा वसूल आला नाहीं व नेहमींपेक्षां खर्च जास्त झाला याशिवाय खजिन्यांत ६००० रुपयांचे तांब्याचें नाणें शिलक होतें. १८८४ त मुंबई सरकारानें ४ लाख रुपये कर्जाऊ दिलें नसून तीन लाख रुपये दिले आहे. ६ लाख उत्पन्नापैकीं दरसाल ५०,००० चा हप्ता इंग्रज सरकारास भरण्यांत येत होता व हल्लीं या सरकारचें फक्त ८०,००० रुपये देणें आहे. या रकमेंत शेंकडा ४ ½ टक्के व्याज आहे. याप्रमाणें या संस्थानची स्थिती आहे. आमच्या सरकारानें जेव्हां संस्थानचा चार्ज घेतला त्यावेळीं २ रुपये शिलक होती असें जें उघड सांगण्यांत आलें ते निःसंशय खोटें व लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकणारें होतें असें मि. लाड यांच्यावरील स्पष्टीकरणावरून होतें यासाठीं यासंबंधानें व लाडच्या इतर गोष्टीविषयीं आमच्या मुंबई सरकारानें योग्य जबाब देणें वाजवी आहे.

ब्राझील प्रांतांतील प्रजासत्ताक राज्य इंग्लंडानें कबूल केलें व तेथील आपल्या सैन्यास त्या राज्याच्या निशाणास मान देण्याचा हुकूम करण्यांत आला आहे. ऐर्लंड बिचारें पार्लमेंट मागत आहे तेंही त्यांस मिळत नाहीं. लकडी शिवाय मकडी वळत नाहीं!

मुंबईस बसलेले फाक्टरी कमिशन गेल्याच्या मागील गुरुवारीं मुंबईहून अमदाबादेस गेले व लागलीच तिसरे दिवशीं शनवारीं कानपुराकडे गेले.

कानडा प्रांतांतील लोकही आपण इंग्रजांच्या हातून सुटून स्वतंत्र व्हावें अशी खटपट करीत आहे. हिंदुस्थानच्या लोकांस सामाजिक विषयाशिवाय विषयच नाहीं!

ब्रह्मदेशांत ३८,८६,५३७ एकर जमिनींत भात पेरण्यांत येतें. ठा० अ०

न्यू आर्लिआन्स येथें कांहीं इटालिअन लोकांनीं तेथील मुख्य पोलीस अंमलदाराला ठार मारल्यामुळें तिकडे बरीच अस्वस्थता झाली आहे.

महारोगाच्या परिक्षेकरितां विलायतेहून कांहीं डाक्टर लोकांचें एक कमिशन यावयाचें आहे. तें कमिशन येथें सुमारें एक वर्षभर राहील असा अजमास आहे.

मि. ग्लाडस्टन यांनीं मिड काल्डर येथें भाषण केलें त्यांत त्यांना ऐरिश लोकांना त्यांच्या देशांतील राज्यव्यवस्था पाहण्यास पूर्ण अधिकार द्यावा असें सुचविलें; व प्रत्येक मनुष्याला मत देण्याचा अधिकार असावा. व एकच पार्लमेंट हल्लीं इतकें ७ वर्षेपर्यंत राहूं नये अशाविषयीं सूचना केल्याचें समजतें.

असें ह्मणतात कीं सोन्याचा भाव उतरल्यामुळें व एक्स्चेंजचा भाव वाढल्यामुळें द्रव्य संबंधानें हिंदुस्थानचा स्थिती पुढें चांगली रहाणार नाहीं.

गेल्या गुरुवारीं म्हणजे दसऱ्याच्या दिवशीं पतिआळाच्या महाराजांना पूर्ण अधिकार देऊन त्यांना गादीवर बसाविलें.

इंदुरच्या चाललेल्या जवाहिराच्या खटल्यांत कापशे यांस ४ वर्षें सक्त मजुरी व १२५०० रु. दंड याप्रमाणें शिक्षा झाली असें समजतें. सु० प०

पंजाबांतील एका युरोपियन पो. सु. स मुक्किजिकडे त्याचा फार कल असून ती तिच्याकरितां कांहीं खटपटही करीत असे, म्हणून सरकारानें कामावरून एकदम दूर केलें.

ठाण्याजवळील नेरुळ गांवीं एक शेतकरी मेला. त्याच्या बायकोस तें पतिमरणाचे दुःख न सोसून तिनें त्याच्या चितेंत बेधडक उडी टाकिली, परंतु त्या यातना तिला असह्य होऊन ती बाहेर आली, व सर्वांग भाजलें असल्यामुळें दुसऱ्यादिवशीं आपल्या नवऱ्याचा तिनें मार्ग धरिला. क० त०

मंगळग्रहावर लोक वस्तीचा संभव— प्राचीच्य ज्योतिर्विदांनीं नलिका यंत्राचे साधनानें चालविलेल्या अंतरिक्ष शोधनापासून दिवसें दिवस अपूर्वशोध व कल्पना निघूं लागल्या आहेत. भूतलावर जीं खनिजद्रव्यें दृश्य होतात, तींच द्रव्यें आकाशांतून पतन पावणाऱ्या जडांत हो सांपडतात ह्यावरून पृथ्वीचें व अंतरिक्षाचें सादृश्य आहे ही कल्पना शोधकांनी पूर्वींच काढलेली आहे. आतां कहोल शोध तर ह्याच्याही पलीकडे जाऊन आपणांस आकाशांत जे प्रकाशित ग्रह दिसतात त्यांवर पृथ्वीप्रमाणें खचित मनुष्यवस्ती असली पाहिजे अशी कल्पना निघाली आहे; आणि ती सकारणही आहे असें दिसतें. आपणं जो तेजोमय मंगल ग्रह पाहातो, त्या ग्रहावर आफ्रिकेतील मोठाल्या सरोवराप्रमाणें सरोवरें असून त्यांतन शास्त्रीय रीतीनें कालवे खणून नेलेले दिसतात. असा शोध आलीकडे एका इतालियन ज्योतिर्विदानें लाविला आहे. व त्यावरून मंगलावर कुशल लोकांची वस्ती असली पाहिजे, व त्यांणी आमच्या इरिगेशन खात्याप्रमाणें लोकोपयोगासाठीं ते कालवे खणलें असावेंत ही कल्पना निघाली आहे! पाश्च्यात्यांच्या शोधकबुद्धीची एकंदरींत कमाल आहे खरी!

अविनाशचंद्र कविरत्न नांवाच्या कलकत्यांतील विद्वान गृहस्थांनीं चरक व सुश्रुत ह्या प्राचीन सर्व मान्य वैद्यक ग्रंथांचे आधारानें एक मासिक पुस्तक काढण्याचा विचार केली असून त्या कामीं त्यांना सरकारापाशीं मदत मागितली आहे असें समजतें. हिंदुस्थानांतील प्राचिन वैद्यक पाश्चात्य वैद्यकाचा आधार आहे, त्याच्या पुनरुद्धारास सरकारानें मदत करणें अगदीं अवश्य आहे

नागपूर येथें स्वदेशी कापडाच्या गिरणीचे पायाचा दगड बसविण्याचा समारंभ ता० २३ रोजीं मोठ्या समारंभानें झाला. स० शो०

नेपाळसरहद्द —नेपाळ सरहद्दीवर गुरखे रांच्या चोऱ्या होऊं लागल्या असून त्याकडे हिंदुस्थान सरकारचें लक्ष बरेच दिवसां पासून लागलें आहे व ह्या साठीं नेपाळचे रेसिडेंन्ट मेजर डयूरंड हे येत्या हिवाळ्यांत इंग्रज सरकार व नेपाळसरकार यांच्यामध्यें अशा प्रकारचे सरहद्दीवर अपराध घडं नयेत ह्मणून एकमेकांस बांधून घेण्यासारख्या कांहीं अटी ठरविण्याच कामास लागणार आहेत.

विजेच्या घोड्यावरील शर्यत. नईस ( यू. स्टे. ) येथें शर्यतीचीं मैदानें तयार केलीं असून त्या मैदानांत विजेच्या घोड्यांवर बसून शर्यती खेळाव्या अशी व्यवस्था केली आहे. शर्यतीचे शोकी व हौशी लोकांस घोड्यावर बसून धांवण्यांत अपघाताची वगैरे जी भिती असते ती भिती ह्या विजेच्या घोड्यांवर बसण्यामध्यें बिलकूल नाहीं. असल्या शर्यतीचीं मंडळें कशीं असतात व त्या शर्यतीच्या घोड्याची गति कशी असते याची चित्रें सायंटिफिक अमेरिकन पत्रांत झाली आहेत.

इंदुरास रवाना झालें. —रा. ब. नेद्रकर हे गेल्या गुरुवारीं ( दसऱ्याचे दिवशीं ) पुण्यांहून इंदुरास रवाना झालें. त्या दिवशीं त्यांस येथील वकील लोकांनीं नेंदरामनाईक यांचे बंगल्यांत पानसुपारीचा समारंभ केला.

खंबायतच्या नबाबसाहेबांचा अधिकार सरकारणें काढून घेतल्याची जी बातमी प्रसिद्ध झाली आहे, ती खोटी असून फक्त सरकारानें नबाबसाहेबांस आपल्या वतीनें दिवाण नेमून दिला आहे अशी बातमी बाहेर आली आहे. ज्ञा० प्र०

देशी तारू चितागंग येथें कांहीं बंगाली सुतारांनीं दुसऱ्या कोणाची मदत न घेतां, एक लहानेंस तारूं बांधलें आहे याला बत्तास हजार रुपये खर्च आला. निव्वळ देशीं सुतारांनीं हें बांधलेलें हें पहिलेंच तारू होय. आपल्या देशीं लोकांत ही कारागिर आहे तच.

केशविक्रय – फ्रान्स देशांतील दक्षिण दिशेकडील प्रांतात पुष्कळ विवाहित स्त्रिया वर्षानुवर्ष तेल वगैरे लावून आपलें केश वाढवितात व तेबरेच मोठे झालें ह्मणजे एखाद्या दुकानदारास विकून त्याच्या मोबदला कांहीं कापड वगैरे जिन्नस घेतात.

यंदा सिंधुनदीच्या थडीमध्यें गव्हाचें पीक फार चांगलें आहे. न्या. सिं.

नोटिशीचें उत्तर.

रुप्या वलद रामा माहार राहणार मौजे रिधोरे यांस नोटीस देणार माणी माहारीण राहणार रिधोरे तालुके बाळापूर असें कळविते कीं तूं ता० ९ माहे आक्टोबर सन १८९० इसवीचे वैदर्भ वर्तमानपत्रांतून नोटीस दिलीस त्यांतील मजकूर सर्व खोटा आहे. मी खंडु वलद भवानी माहार याची मोहतुराची बायको आहे. मी दासी नाहीं खंडुच्या माहारकीच्या हक्काची मी कायदेशीर वारस आहे. खंडूस मरून आज वीस वर्षे झालीं. मी त्याच्या सांगण्याप्रमाणें मुलगा दत्तक घेतला आहे. मी त्याचें कर्जही फेडलें आहे. या सर्व गोष्टीबद्दल गांवचे पाटीलपांडे यांस सर्व माहीत आहे. मी खंडूची कायदेशीर वारस नाहीं याजबद्दल तूं पाहिजे तर दाखला मिळीव मजला त्याचे कांहीं कारण नाहीं. मी खंडुचा हक्क वगैरे ज्याप्रमाणें घेत आले त्याप्रमाणें पुढेंही घेणार व खंडूचा दत्तक मुलगा गोविंदा वलद उकरडा हाही माझे मागें हक्क वगैरे सर्व घेणार हें तुजला कळावें. म्हणून दिली नोटीस सही तारीख २८ माहे आक्टोबर सन १८९० इ०

( सही )

सहीची निशाणी माणी महारीण राहणार रिधोरे इच्या हातची असे.

## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | १००८= |
| ” १५ दिवसाच्या मुदतीची | | | १००८= |
| सुवर्ण.... | २१ | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ८६॥ | उडीद | ६५ |
| गहूं काठे | ६० | बनशी | ६७॥ |
| जवारी | ३८ | चणे | ६५ |
| सर्की | ४८= | मीठ | ४८≡ |
| तूप | ७॥ | तेल | ४॥।= |

सट्ट्याचे भाव

| | | |
|---|---|---|
| जवारी वसंत संवत | १९४७ | ४२॥।= |
| गहू वैशाखशुद्ध | १९४७ | ५८ |
| आळशी चैत्रशुद्ध | १९४७ | ७९॥।≡ |
| रुई फाल्गुन शु. | १९४७ | ५७॥।≡ |
| सर्की व. नवे सालाची | १९४७ | ३॥।- |

हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।२
सहामाही ३ " " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस ........०१

Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 " 1Rs. 8 as
Six monthly............3 " 9 as
Single copy..................................4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIV AKOLA MONDAY NOVEMBER 10 1890 NO 44

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख १० माहे नोव्हेंबर सन १८९० इ० अंक ४४

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

### सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांचे, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

### गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्त्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदू ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होतें. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर ण्याचा


### कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला म्हणजे पुरें आहे. याने सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन्. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गीतमराव केशव, मुंबई.

### सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

### जाहिरात.

संस्थानसोंडूर जिल्हा बल्लारी इलाखा मद्रास येथें श्रीकार्तिक स्वामीचे महास्थान आहे. तेथें येत्या कार्तिक महिन्यांत शुद्ध पौर्णिमेस महायात्रा भरण आहे. तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्ष लोकांच्या सोईकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शनटिकीट | १ |
| बारावर्षांचे आंतील मुलास दर्शनटिकिट | १ |

कार्तिक शुद्ध १३ पासून तो कार्तिक शुद्ध १५ पावेतों श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर टिकीटे विकत मिळतील. ब्राह्मणा वाचून इतर लोकांनी अभिषेक पादस्पर्श वगैरे ब्राह्मण द्वारा करवावें. तारीख १० माहे आक्टोबर सन १८९० इसवी.

सही

सही भीमराव पोळ म्यानेजर
श्रीकार्तिक स्वामी देवस्थान संवस्थान
सोंडूर
जिल्हा बल्लारी.

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन वद्य १२ शके १८१२.

पारसिकांनीं आपल्या हतभाग्या विधवा स्त्रीयांच्या उपाजिवनार्थ १६००० रुपये वर्गणीनें गोळा करावे, व दर वर्षीं दोनशें अथवा तीनशें अनाथ विधवांच्या पोटापाण्याची तरतूद आणखी एका अलाहिदा फंडातून करावी आणि आम्हीं आमच्या गत सौभाग्य झालेल्या अबलांचा केशभार कायम ठेवण्यांत चूर असावें, तेव्हां त्या लोकांची व आमची बरोबरी व्हावी कशी? व त्या लोकांच्या सुखानंदाचा वाटा आम्हास मिळावा तरी कसा नवऱ्याच्या राज्यात चार दिवस सुखानें घालविलेल्या अनाथ अबलेस केश कलापाचे वियोग दुःख हाती येणाऱ्या पोळपाट लाटण्याच्या दुःखा पेक्षां असह्य नसेल हें कोणी ही कबूल करील पदराला खार न लागे अशी सुधारणा आमचे सुधारक करण्यास तयार असतात व म्हणूनच त्यांस यश येत नाहीं. व कधीं येणार ही नाहीं.

### कायद्या विरुद्ध सभा.

मुंबईतील माधव बागेंत कांहीं वर्षांपूर्वी ( १८८६ सालीं ) भरलेल्या टोलेजंग सभेनंतर परवा च्या रविवारीं ( २६ आक्टोबर ) पुण्यास भरलेल्या सभे सारखी सभा दक्षिण महाराष्ट्रांत मागें कचितच भरली असेल. प्रस्तुत चालूं असलेल्या समाज सुधारणे बद्दलच ही सभा भरविण्यांत आली होती. मि. मलबारी शेट व त्यांचे अनुयायी यांचें म्हणणें असें आहे कीं, पूर्वीपार चालत आलेल्या रीतिभातींत सरकारनें कायद्यानें सुधारणा करावी व हल्लीं फारच अहितकर ठरत असलेल्या बालविवाह, केशवपन व अखंड वैधव्य इ० दुष्ट चालीचा बीमोड कायद्याच्या सक्त बजाविणीनें करावा. ह्या म्हणण्याचें खंडण करून सरकारानें सामाजिक व्यवहारांत हात घालण्याच्या भानगडींत पडण्याची गरज नाहीं; जी काय सुधारणा होणें असेल ती आमची आम्हांस करण्याची ताकद आमच्यांत नस जशी येत जाईल ततशी ती आम्ही करूं असें आपलें मत सरकारास कळवावें म्हणून सुमारें पाच हजारावर लोक वरील सभेत जमले होते.

ह्या सभेची आमंत्रण पत्रिका श्री. पुरंधरे, रास्ते इ० बड्या लोकांच्या सह्या निशीं वाटली गेल्यावर निरनिराळ्या मताच्या लोकांकडून प्रति व उपप्रति सूचना बाहेर पडल्या. निमंत्रण पत्रिकेंत फक्त मलबारी प्रभृति कायदेबाज मंडळींनीं केलेल्या अर्जाच्या उलट अर्ज करण्या बद्दल मंडळीस अमंत्रण दिलें होतें. परंतु रा. रा. नुलकर, कानिटकर इ. उपपद्धारी मंडळींनीं भरणाऱ्या सभेंत "आमच्या समाजांतील बाल्यविवाह, कन्या विक्रय, बालवृद्ध विवाह, विधवाकेशावपन इत्यादि गोष्टी पैकीं प्रत्येक बाबतींत समाजाकडून आपण होऊन सुधारणा करण्याचे संबंधानें आज पासून सहा महिन्याचे आंत सभा भरवून राजपुतान्यांतील लोकांनीं जसे नियम केले आहेत तसे नियम आपले लोक स्थितीचे मानानें करण्याचो व केलेले नियम अमलांत आणण्याची झटून तजवीज करूं." असा ठराव व्हावा म्हणून एक सूचना केली होती व त्याच प्रमाणें दुसरी एक सूचना त्या दिवशीं प्रसिद्ध झाली; तींत कायदा मागणाऱ्या मंडळी पुरतीच सरकारापाशीं कायदा मागण्याचा संभव ठराव करावा असें सुचविलें होतें व खालीं दिलेलीं आणखी आठ कलमें त्या सुचनेंत नमुद केलीं होतीं. ( १ ) मुलीचें लग्न १६ वर्षाच्या आंत करूं नये. ( २ ) वीस वर्षांचे आंत मुलाचें लग्न करूं नये. ( ३ ) पुरुषाचें लग्न ४० वर्षां पुढें होऊंनये ( ४ ) करणे झाल्यास विधवेशी करावें ( ५ ) दारूपिणें बंद असावें. ( ६ ) हुंडा घेऊंनये. ( ७ ) मालीचा दहावाभाग सार्वजनिक कामाकडे द्यावा. ( ८ ) केशवपन करूंनये. ह्या उपप्रती सूचनेवर रा० टिळक प्रभृति लोकांच्या सह्या होत्या वरील उपप्रति सूचना सारखेंच एक विनंती पत्रक प्रो० बाळ गंगाधर टिळक ह्यांच्या सहीचे अलाहिदा निघाले होतें. सभेचें अध्यक्षस्थान वे० शा० संपन्न महा महोपाध्याय रामशास्त्री आपटे यानीं स्वीकारिलें होतें. शास्त्री बोवांचें भाषण झाल्यावर रा. रा. टिळक यांनीं सभेचा उद्देश कळविला व लोकमता विरुद्ध सरकारनें कायदा करूंनये असा जो अर्ज सरकाराकडे पाठविण्यांत येणार आहे त्यावर सर्वांनीं सह्या कराव्या असें सांगितलें. नंतर रा. ब. नोगळकर यांनीं अर्जाचा मसुदा वांचून दाखविला व सर्व लोकांनीं टाळ्यांच्या गजरानें त्या अर्जास आपली पूर्ण संम्मती आहे असें दर्शविलें; व उलट पक्षाकडून कोणी गृहस्थ बोलण्यांस उठलें असतांही 'कायदा नको' अशी एकच गर्जना करून लोक चालते झाले. व सह्या घरोघर फिरून गोळा करण्याचें ठरलें.

सभेतील लोकांनीं आपलें म्हणणे ऐकून घेतलें नाहीं असा सुधारकांचा ह्या सभेवर मोठा आरोप आहे परंतु असल्या चिथरलेल्या लोकां पुढें एखाद्या साधारण गृहस्थाला सामान्यास देण्यांत सुधारकानीं चूक केली. रा० ब० रानड्यां सारख्या सर्वमान्य गृहस्थाची योजना अशा ठिकाणीं होणें रास्त होतें. व त्यांचें म्हणणें ऐकून घेणें त्या लोकांस भाग पडलें असतें: 'हलवायाच्या घरावर तुळशी पत्र' ठेवण्यांत सुधारक तरबेज झाले आहेत असा लोकांचा जो समज झाला आहे तो अगदीं खरा आहे, असें म्हणणें अशा त्यांच्या कृतीनें भाग पडतें. असो. पांच हजारांवर जमलेल्या लोक समाजांत वाद विवाद करणें व सर्वांस मान्य असा त्या वादाचा निकाल त्याच बैठकींत होणें, हें फार कठीण आहे आणि सभा धुरीण वरानींवंबास आवकाश न देतां तिचें विसर्जन केलें ही मोठी प्रशंसनीय गोष्ट होय.

ह्या सभे पासून दोन महत्वाच्या गोष्टी बाहेर पडल्या; एक, शेटमल बारीयांच्यावर ताण करून मुलीच्या लग्नाचें वय सोळावर्षाचें असावें असें म्हणणारे बरेंच लोक आपल्यांत

आहेत व दुसरा दारूपर्णे आपल्या ब्राह्मणां सारख्या पूर्ण पवित्र ह्मणविणाऱ्या लोकांत इतकें स्वस्त झालें आहेकीं, भर सभेंत दारूपिण्याचें सोडणें आपल्याच्यानें होणार नाहीं असें सांगण्यास त्यांस शरमही वाटेनाशी झाली आहे सुधारणा देवीचा महिमा अगाध आहे असें ह्मटलें पाहिजे. 'तुकाह्मणे उगेंराहावें जेजें होईल तेंतें पहावें' ह्या संतवाक्याचें अनुकरण करणें हेंच सुखा समाधानानें आपला तरी काळ असें ह्मणणारास योग्य आहे.

---

परसेवेंत तत्पर असणाऱ्या आह्मा लोकांना मागील एकदोन शतकांचें वैभव अंशतः तरी दाखवून देऊन आमच्या पूर्वजांच्या पराक्रमाचें, शहाणपणाचें व स्वतंत्रतेचें चित्र आमच्या पुढें ठेवण्यास हल्लींचीं संस्थानें कारण भूत व्हावयास पाहिजे होतीं. व पूर्वजांचें हुबेहुब चित्र आमच्या पुढें मांडण्या जोगीं जर ह्या संस्थानांची स्थिति सुदैवानें कायम असती तर खालसा प्रांतातील प्रजेचें आपल्या वडिलां विषयीं असलेलें अनास्थेचें वर्तन कायम रहाण्यास जागा न रहाती व स्व राज्यांतील स्वतंत्रतेच्या गुप्त ठेव्याचें खरें महत्व त्यांच्या पुढें सदोदित कायमेच ठेवण्याची खबरदारी ठेवण्याचें परिश्रम संस्थानिकां कडून जर घेतले गेले असते तर स्वतंत्रता व स्वराज्य ह्या दोन्हीही दैवतांची अराधना देवी श्री व्हिक्टोरियाच्या छत्रा खालीं असलेल्या भक्तां कडून यथासांग घडली असती व परकीयांचे पोवाडे गाण्यांत व्यर्थ कालक्षेपन होतां आपल्यातील मानी मर्दुमकीचें मनन करण्यास आवकाश देण्याचें श्रय आमच्या छोटेखानी राजांस मिळालें असतें. परंतु जों पर्यंत ह्या देशाच्या दैवानें निद्रावश होण्याचा कृत संकल्प केला आहे ते पर्यंत "असें केलें असतें तर तसें झालें असतें" इत्यादि सिद्धांत ठरविण्या पलीकडे मजल जाणें अशक्य आहे, हें पूर्ण जाणून असलें पाहिजे. परोपकारी इंग्रज सरकारच्या लबड्यांतून सुटून नांव घेण्या सारखीं अशीं तीन किंवा चारच संस्थानें आहेत, त्यांनाही गट्ट करण्यास आमच्या दयाळू सरकारचा मागें पाय नाहीं, व डोळ्यांत तेल घालून त्यांच्या वर्तनावर नजर ठेवण्यास आमचे अधाशी सरकार तत्पर आहे. अशा स्थितींत जर आमच्या नामधारी राजांकडून खालीं दिल्या सारखीं अनन्वित कृत्यें घडतील व पराचा कावळा होऊन जर त्या कृत्यांची जगा पुढें मांडणी होईल तर संस्थानां कडून मिळणाऱ्या फायद्याची आशा एकीकडेच राहून त्यांच्या अस्थित्वांस धोका बसेल असें ह्मणणें भाग आहे.

इंदुर संस्थानचे महाराज तुकोजीराव होळकर यांचे हयातींत सन १८८२ सालीं त्यांच्या तराणा नावाच्या महालांत तेथील अमीन मारतंडराव कापसे यांस सरकारी वाड्यांत खणींत असतां एक द्रव्यानें भरलेला हंडा सांपडला. तो सरकारांत न देतां तसाच अपहार करण्याच्या हेतुनें घरीं ठेवला, असा त्यांच्यावर आरोप होता. श्री. तुकोजीरावांनीं चवकशी करून त्यांस त्या आरोपा पासून मुक्त केलें. पुढें त्यांच्या कारकिर्दींत हें प्रकर्ण विझाल्या सारखेंच होतें. परंतु त्यांच्या मृत्यु नंतर १८८७ सालीं श्री. बाळासाहेब महाराजानीं नाथनसुभ रा. रा. कृष्णराव देव यांच्या कडून चवकशी करविली परंतु तिचा निकाल रा० रा० कापसे यांच्या सारखा झाला. नंतर पुढल्या वर्षीं महाराजांनीं गंगाधर भिकाजी आपले सेक्रेटरी यांच्या हातून चवकशी करविली परंतु तींतही कांहीं निष्पन्न न होतां रा० रा० कापसे दोषातून पार पडलें. तरी महाराजांची खात्री होईना व त्यानीं आपल्या राज्या तील तीन कामगार लोकांची कमेटी नेमून तिच्या कडून न्याय कोर्टापुढें हें खटलें रवाना केलें. तेथें ही रा० रा० कापसे निर्दोषी ठरविण्यांत आले. परंतु दरबारच्या हुकमा वरून दहा हजाराचा जामीन त्यांस देणें भाग पडलें. आपली दोषी असल्या बदलची खात्री असतांही न्याय देवते पुढें ते दोषमुक्त होतात ह्याचा विषाद वाटून श्री० बाळासाहेब महाराजांनीं आपल्या सत्तेचा महिमा दाखविण्यास सुरुवात केली. प्रथम न्यायदेणाऱ्या न्यायाधिशांना व त्यांच्या अनुयायानां आपल्या खऱ्या स्वरुपाचें दर्शन देऊन त्यांचा फार उपमर्द केला व नंतर रा० रा० कापशांना अती क्रूरतेनें वागवून आपली अपकीर्ती दुणावून घेतली दोनादिवस मारहाण करून व त्या बिचाऱ्याची गांवांतून धिंडकाढून त्यास न घडलेल्या गोष्टी घडल्या असें कबूल करावयास लावून चार वर्षांची शिक्षा ठोठाविली व साडेबारा हजार रुपये दंड ही केला. ह्या कृत्याबद्दल इंग्रज सरकारास मध्यें हात घालावा लागेल असा सुमार दिसत आहे आणि ह्मणूनच एका दूरच्या संस्थानातील एक गोष्ट वाचकां पुढें जशी प्रसिद्ध झाली आहे तशी ठेवण्याचा आमचा विचार झाला. वरील हाकिगती वरून स्वराज्यांत कितपत अंधाधुंदी चालूं असतें हें दिसून येईल व अभिमान वाटण्या सारख्या स्थितींत न राहतां टपून बसलेल्या मायबाप इंग्रज सरकारच्या तावडींत आमचे नामधारी राजे सांपडण्यास कितपत उशीर लागेल ह्याचाही विचार करितां येईल.

---

( मा० अं० पुढें चालूं )

गर्भधारण संभव काल व गर्भधान योग्य काल हे एक नसून भिन्न आहेत असें बहुतेक शास्त्रवेत्यांचेंमत आहे. व त्याकडे लक्ष न दिलेंतर काय परिणाम होतात ते बघा एखाद्या १६ वर्षांच्या मुलाला मूल झालें ह्मणजे त्याच्या पौरुषत्वाचीं वाढ पूर्ण झाली असें मानता येणार नाहीं व त्याची गणणा मनुष्यांत न होता पोरांतच होईल. मनुष्य पूर्णावस्थेस येण्यास त्यास दाढी मिशी प्राप्त होणें, अवाजातील कोवळेपणा व अंगातील नाजूकपणा जाणें, व एकंदरीत स्वभावांत, व त्याच्या विचारांत पोरकटपणा जाऊन पोक्तपणा येणें जरुर आहे. नुसते पौरुषत्व आल्यानेंच मनुष्य पूर्णावस्थेस आला असें आपण समजत नाहीं. व हाच न्याय स्त्रियांस ही लागू आहे. एखाद्या पोरीस १२ किंवा १३ वे वर्षी मुलें झालें ह्मणजे ती मातृपदास योग्य झाली असें होत नाहीं. तिच्या आंगीं मातृत्व येण्यास तिच्या शरीरांत पुरुषां प्रमाणें बराच भेद झाला पाहिजे. तिची सर्व अवयवें पूर्ण स्थितीस वाढलीं पाहिजेत व तसें होण्यास सरासरी २० वर्षें लागतात. व या पूर्वीं तिच्या आईपणास आरंभ झाला असतां ती व तिची मुलें बहुशा रोगट व निशक्त होतात. अशी प्रजा एक पाठीमागून एक अशी निपजत चालल्यास कांहीं पिढ्यांनीं उत्पन्न होणारी प्रजा वाऱ्यानें ढकलून पडणारी निघेल यांत कांहीं नवल नाहीं. ज्या देशांत इतके शक्तीमान लोक आहेत किंवा उत्पन्न होतील त्या देशांची, स्थिती काय होईल हें स्पष्टपणें सांगणें जरूर दिसत नाहीं. व हल्लीं तुमची स्थिती तशी होत चालली आहे. हें उघड आहे. पूर्वींच्या लोकांचे बळ व सामर्थ्य कोणी कडे व तुमची हल्लीची स्थिती कोणीकडे जों पर्यंत मुसलमान लोकांचा शिरकाव इकडे झाला नव्हता व त्यांच्या संसर्गानें स्त्रियास कोंडून ठेवण्याची लहानपणीं मुलांचीं लग्न करण्याची दुष्ट चाल जों पर्यंत तुमच्यांत चालूं झाली नव्हती त्या वेळेचे तुमचे शौर्य आतां कुठें आहे. पूर्वींचे तुमचे रजपुत व मराठे लोक अद्याप कायम आहेत परंतु त्यांचे तें आतां शौर्य व मरदुमकी कुठें गेली व असें जर तुह्मीं पिढ्यान्पिढ्या निशक्त होत चालले तर तुह्माला इतर राष्ट्रांच्या दास्यत्वांत दिवस काढावे लागतील यात नवल ते काय.

ही चाल धर्म दृष्ट्या मोडता येणार नाहीं असे तुह्मा पैकीं पुष्कळ मंडळी आग्रह घेतील परंतु माझी खात्री आहे कीं धर्माचे बंधन याल मुळा पासूनें नसून कांहीं आपलपोट्या मंडळीनें मुसलमानी अमलात उगीच घुसडून दिलें आहे. मुसलमानी अमलांत जेव्हां झोटींग बादशाही सुरुझाली तेव्हां स्त्रियास पड्द्यांत ठवणें, त्यांचें लग्न लवकर करणें वगैरे गोष्टी अवश्य झाल्या व त्या साधण्या करितां धर्माचें लचांड उपस्थित झालें व त्यावेळेच्या स्थितीस तसा प्रकार होणें जरूरही होतें. कोणत्या गोष्टीला धर्माचे पाठबळ मिळणार नाहीं असा कांहीं प्रकार नाहीं. गुलामाच्या व्यापारा सारखी निंद्य गोष्ट ही धर्म प्रणीत आहे, असें मानणारे लोक होऊन गेले व हल्लीं सुद्धां कांहीं लोक आहेत त्या वरून धर्माची आडकाठी या कृत्यास आणतील यांत कांहीं मोठें नवल नाहीं.

---

# The Berar Samachar

## MONDAY, NOVEMBER 10 1890

### OORSELVES.

We request our subscribers will allow us the usual Diwali Holidays, which they have hitherto done ungrudgingly. As our office will be closed for the Holidays there will be no paper issued next week.

### MR. HUME ON "THE PEOPLE'S CAUSE."

( Continued from our last issue . )

This is their creed, pure and simple; say they, we are the pick of the land, the flowers of the flock, and we it is on whom, in virtue of our higher culture and our greater wisdom, it naturally devolves to decide how the land shall be ruled. They are fallen they admit, poor things, on evil days, and do not quite venture to say this in so many words, now as they did in my father's time; but this is, has been, and ever will be the essence of the Tories' political creed.

To them we reply that, even conceding their superior culture and wisdom, which is not, it must be confessed, quite so apparent to you and me as it seems to be to them, and admitting that they desire to use any power entrusted to them, solely for the general good, and not for the advancement of their own class-- and this is an admission that in view of all that has happened in the past the most charitable amongst us find it difficult to make-- but I say even granting all this, we are many and they are few. It is im possible for them to put themselves in all our places, to feel all we feel, to realize a tenth part of all our difficulties, troubles, and sufferings; and so if we are to secure the greatest happiness of the greatest number, clearly that greatest number, and not their tiny coterie, must have the most potential voice in the decision of all public affairs. They may be wise individually, though I for one see scant sings of it; but, be this as it may, their wisdom in the aggregate is but as a feather when weighed against the massive combined common sense of the people as a whole.

No! let their cry be "Government by the fittest"— meaning themselves, ours is "Government by the people."

This, in its highest generalization, is our political creed; but, in order that it may bear good fruit, it is first of all essential that you yourselves should hold it in real earnest; that you should not only repeat it with your lips, but act on it throughout your lives; that it should live with you and burn in your brains and hearts, an unremitting incentive to higher and nobler thoughts, and more strenuous and unselfish exertions for the general good.

You here are at this moment represented—say rather, misrepresented— by a champion of the classes, by one whose party not only does not trust, but distrusts and dislikes, the people, whose political creed is diametrically opposed to your creed—the creed of the people.

Surely this is marvellous; for at least three-fourths of the votes in these burghs are held by the people. The people have only to be true to themselves to defeat the candidate of the classes, not by the few score only, by which your present member holds his seat, but by thousands of votes; and yet, here you are—you, the people—misrepresented by an exponent of the creed which is hostile to all *your* best hopes, and to the best hopes of humanity.

Only one explanation of such a miserable anomaly is possible. You have not been sufficiently in earnest; the great bulk of you have thought that if you went to the polling booths and voted straight you had done your whole duty. Not ten per cent of you have ever laboured in real earnest, in anticipation of the coming elections, to make the triumph of your cause certain. There is scarcely one man amongst you who, had he done his level best, could not have brought over at least one waverer, one misguided brother, to the right side—to his natural side, the side of the people.

(To be continued.)

---

### EDITORIAL NOTES.

### LATER MARRIAGES CONDUCIVE TO LONGEVITY

So much, of late, has been written and talked about our marriage customs, that it would appear wearisome to most of our readers to peruse any more comments on the subject. This view of ours is not guessing but a stern though a painful fact. We have often heard people— people posing before the public as the leaders of the society— gravely saying that the subject of reform should be safely dispensed with and the customs might be allowed to continue, they being not so mischievous as so often & so persistently represented. But fortunately such typical people have no practical hold or influence in the community, and he would be an enemy of his society and country who would listen to the advice of these men. We, moreover think it our sacred and solemn duty to

bring forcibly and vividly (of course as much as lies in our power) to the notice and for the serious consideration of our readers any communication bearing on the improvement and reform of our social customs. It is on this account we wish to speak about the sound advice given by Mr. McLauchlan slater, of the Oriental Life Assurance Company, to the company's native constituents, appealing to and urging them to help the reform movement of later marriages 'as an essential condition of attaining to greater average longevity.' The Hindu average life is shorter than the average life of any civilized people. And though there are many forces working or causes operating against the longevity of Hindu life, yet it cannot be denied that the marriage and specially early consumation system plays a most important part in causing the evil. To quote the words of Mr. Slater on this point: 'That the age of marriage has a direct influence on the probable duration of life & on the health of the offspring, there can be no manner of dout, and vital statistics have borne out the theory. To repeat what I have already said:— Vigorous offspring result from the union of mature and vigorous parents, whilst the reverse obtains when the parents are weak and immature, as is so often the case in this country.' Will our people shake off their blind prejudices and try to increase the limit of marriageable age?

## THE MISERABLE INERTNESS OF THE HINDU SOCIETY.

It has been agreed on all hands that reform in social matters is highly desirable-nay necessary; but the parties— the reformers and the oppositionists differ as to the means and measures for the purpose of securing the desired object. The reformers insist on legislation, while the other party solemnly declares that legislation would be not only useless but mischievous. The society is thus made to hang on the two horns of dilemma, and the eivil customs are allowed to work mischief in the country. We would certainly cherish the ambition of seeing reforms carried out by our own people without Government aid or foreign advice. But ah! our community is so inert, so inactive, so slow to move even towards a path of good, that pessimistic view forces itself even on optimistic minds as to the future of our people. If our people can show, even in a single instance, that they themselves and without the aid of Government have abolished evil customs and introduced beneficial reforms, we would gladly induce ourselves against legislation. But the absence of such an instance forces the conviction in our mind that legislation in some shape or another is necessary for the good of the people. But it is said that reform through legislation would be opposed by the community. And what reforms are not met at the commencement with opposition and very strong opposition? And again will not reform through non-legislation means evoke opposition? If, therefore, there is no and for a good many years there will not be any, chance or hope o effecting reforms through non-legislation means, why not seek the aid of legislation?

The Indian National Congress.

We learn that Mr. Herbert Gladstone has declined to accept the Presidentship of this year's Congress. In declining the Presidentship, Mr. Gladstone has spoken in very sympathetic terms about the Congress and the native aspirations. This is indeed gratifying, as Mr. Herbert Gladstone is a politician of promise and is likely to fill in near future an important place in the English politics. And the sympathy of Mr. Herbert Gladstone means, though impliedly, an able support from the Grand Old Man. As Mr. Herbert Gladstone has declined to come over to India for the Congress, our congress leaders have determined to ask Dr. Rajendra Lal Mitra of Calcutta to accept the Presidentship of this Congress. The choice would be an excellent one on the personal merits, but we would strongly suggest that as Bombay and Calcutta had the honours of President ship, it is now the turn of the Madras Presidency for the honour of Presidentship. Madras has shown an equal if not more, enthusiasm and zeal in Congress matters, and it is therefore becoming that the Congress should have a Madrasi gentleman for its President this year.

## COMMUNICATED.

### THE REFORM QUESTION AGAIN.

The Poona Meeting held last week in the celebrated temple of Tulsi Bag shows how much misunderstanding exists even amongst the educated classes of Indian society. The measure which both the European and Native public deem expedient for effecting improvement in the physical condion of the women of India is the raising of the age under section 375 of the Penal Code. This is a measure which mercy dictates on behalf of the dumb millions of India. In this, no interference direct or indirect either with the established customs of the country or with the established religions, is contemplated by the promoters. All that is sought to be secured by this measure is the protection of the girls. But When people are determined to misunderstand things neither argument nor counsel can have any effect upon their minds. *Sir* William Hunter, the best advocate of the orthodox party in India does not think that any voilence would be done to the delicate relegious feelings of the people. Mr. Malbari distinctly states in his programme that he has no mind to touch the religious susceptibilities of the Hindoos. What he and a host of other similarly disposed persons propose to do is propose to induce Government to let things alone. The remedy of suing for conjugal rights is aremedy of purely English origin and ought not to have been introduced into the statute Book of India. Proposals such as these are put forward by disinterested persons. Though we are not quite at one with those who think that Government ought not to interfere in these matters still we cannot help thinking that if the people do not care to have any assistance from the Government, it would be but right on its part not to interfere at all. Such or nearly such is the policy proposed by the best friends of India both European and Native.

But the measure under contemplation is one that a government ought to support and bring into force. Permitting brutes to do as they like to the entire detrement of others is a piece of misgovernment. If medical opinion is definite on the point and clearly directs that girls under 14 are not physically fit for intercourse with males, what more is necessary to compel a conscientious government to introduce an enactment that will protect maiden-hood from brutal assaults of men. This point is very forcibly set forth in the Memorial of Indian women to the Queen-Empress. The Bombay Gazette was very curious to know how a learned Professor of the Ferguson College at Poona could have sided with a movement at Poona which was determined to let brutish people alone to molest young girls No doubt the Professor must be regarded as a curiosity. If Hindu men do not have any intercourse with their wives before the wives have arrived at the age of 16, then the proposal of raising the age to 12 does not at all voilate the time honored custom. On the contrary it helps the people to preserve it in tact and guards against its breach by imposing penalties. Sometimes it happens that facts are stranger than fiction and it has curiously happened in this instance. The leaders of the orthodox party in Poona and elsewhere have by their protests to the proposal become defacts enemies of the time-honored customs of the Hindus; while strangely enough the promoters of the proposal have unconsciously become staunch supporters of the Hindu Relegion. Is this not stranger than fiction?

Again the Hindu Shastras dictate the following. Let the husband approach his wife in due season that is, at the time *fit for pregnancy.* It is beyond a shadow of doubt that a girl of 12 is totally unfit for pregnancy. She is so unfit constitutionally. If so, the promoters of the movement to raise the limit of age from 10—12 for purposes of criminal law, favour only that which is enjoined by the Hindu Shastras; and they become worthy supporters of the same while those opposed to it are its inveterate enimies because they do not like that any body of the Hindu race should be compelled to observe its laws. We shall not be very much wrong if we infer from this that Poona meeting was a sham affair, got up either to gain notoriety or defeat the attempts of social enemies. It is a great pity that a Professor of the Ferguson College should have thus degrade 'him' self in the estimation of good men to lend his support to a movement which strangely enough places itself in direct opposition to the time-honored curtoms and institutions of the great Hindu race, as well does it oppose the direct medical authority on the question and thereby ruin for generations to come the constitution of the Hindu girls. The wise counsellors of Government will try to see through this opposition and treat with the contempt which such boyish acts deserve at the hands of sober and wise rulers.

सुट्टी:— पुढील अठवड्यांत दिपवाळीचा मोठा सण आहेतर आमचे प्रिपवाचक सालाबादप्रमाणें एक आठवडाभर सुट्टी देतील अशी पूर्ण आशा आहे. ह्मणून येत्या ता. १७ रोजीं वर्तमानपत्राचा अंक निघणार नाहीं.

## वऱ्हाड.

हवामान— गेल्याआठवड्या पासून आकाश बहुतकरून मेघांनीं आच्छादित आहे. बराच पाऊसही पडला. या पावसानें कपाशीचें व ज्वारीचें नुकसान होईल असें लोक बोलतात. ढाळांनीं रब्बीचे पिकाची इतकी नासाडी केली आहे कीं कित्येक शेतें पुनः पेरावीं लागलीं.

येथील तहशिलीतील कारकून रा० रा० रघुपतराव यांना डे० क० साहेबांनीं दर महा २५ चे २० वर घातलें. याचें कारण एक बेवारसी मालाची पुटळी आपणांकडे आली असतां ती लागलीच खजिन्यांत न ठेवितां विस्मृतीनें यांनीं आपले दप्तराचे पेटींत ठेविली हा अपराध होय. पुटळीचा कागदपत्रें व्यवस्थेशीर दाखला असतां ही शिक्षा जबर असें कोणास ही वाटेल.

मे० रेसिडेंट साहेब इकडे येण्याकरितां ता० १ दिसेंबरच्या सुमाराला हैद्राबाद सोडणार असें कळतें. साहेबांचा स्वारी इंगोली मार्गानें ता० २६ दिसेंबर रोजीं वाशिमास खास येऊन पोंचणार व तेथून ते बहुतकरून कारंजाकडून जाऊन उमरावतीस ता० ५ जानेवारीचे सुमाराला पोंचतील. नंतर साहेब इलिचपुरास जाऊन तेथून दर्यापुरच्या रस्त्यानें मुर्तिजापुरास येऊन येथें ता० १९ च्या सुमाराला येतील असें कळतें.

येथील कायमचे स्मालकॉज कोर्ट जज् मि० मॅकूगिल हे आपले कामावर परत आले.

रा. रा. गणेश बपूजी उटगीकर येथील तहशीलदाराचे कामावर पुनः रुजूं झाले आणि रा. रा. विठूजी नारायण हे आपल्या हुजूर नाझरच्या कामीं गेले.

मे० इलियट साहेब यांनीं सिव्हिल व सेशन जज्जाचें कामाचा चार्ज घेतला व त्या प्रमाणें तें काम पाहावयास लागले.

मे० आबर्ड साहेब हे ज्युडिशल कमिशनरचें काम पाहूं लागले.

( रेसिडेन्सी आर्डरवरून )

मि. जे वेड हे आपल्या ए. अ. रेसिडेंट व सुपरिंटेंडेंट, रेसिडेन्सी सिव्हिल आफिसेसच्या जागीं कायम झाले.

सन १८८६ चा आक्ट २, मेझर आफ लेंग्थ आक्ट, वऱ्हाडास ता. १-१०-९० पासून लागू झाला आहे.

ज्यांची अ० क० ए० अ० क० किंवा तहशिलदाराचे जागी नेमणूक होईल पण ज्यांस कोणतेही अधिकार दिलेले नसतील त्यांना ज्या जिल्ह्यांत त्यांची नेमणूक झाली असेल त्या जिल्ह्यांत तिसऱ्या वर्गाचे माजिस्ट्रेटाचे अधिकार आहेत असें समजावयाचें; त्या च प्रमाणें अशा अ० व ए० अ० कमिशनर यांस त्यांची ज्या जिल्ह्यांत नेमणूक झाली असेल त्याच्या स्थळ सीमेंत थर्डक्लास अ० क० च्या कोर्टाचे दिवाणी अधिकार आहेत. व अशा तहशिलदारांना त्यांची ज्या तहशिलींत नेमणूक झाली असेल तिचे स्थळ सीमेंत सेकंड क्लास तहशिलदाराचे कोर्टाचे दिवाणी अधिकार आहेत असें समजावयाचें.

मि. आमजद हुसेन यांनीं आपल्या एलिचपूर तालुका बोर्ड मेंबरच्या जागेचा राजीनामा दिला त्यांचे जागीं नबाब दाऊदखां यांस मेंबर नेमलें.

मि. बापूजी जनार्दन चोबळ, ए अ. क. यास बुलठाणें जिल्ह्याचे डि. रजिस्ट्रर नेमले.

मि. जी. एच विठिव बेकर, सब असि० कान्सरव्हेटर आफ फारेस्टस यांस सहामहिन्याची आजारी पणाची रजा मिळाली.

मि. शिवलाल बद्रीनारायण यांस वाशीम तालुका बोर्डाचे मेंबर निवडले आहे.

### नोटीस

रा० रा० गोविंद गंगाराम वैष्णव रहाणार अकोलें यांस नोटीस देण्यांत येतेकीं आपले रहातें घराचे उत्तर बाजूस जी खुली जागा होती ती माझी असून आपण बळकावून बसला आहां व त्यांत कवलारू केलें आहे ते आपण आठ दिवसांचे आंत काढून घेऊन जागा खाली करून माझे ताब्यांत द्यावी. नाहीं पेक्षां रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें तारीख ९-११-९० इसवी

सही

रामभट बिन कृष्णभट राहणार अकोलें दस्तुर खुद्द.

## वर्तमानसार

इंग्रज लोकांची तडफड—पुनापटेंद संस्थाननें त्या संस्थानांत बाहेरून येणाऱ्या मालावर जबर जकात बसविण्याचा कायदा केला असून तो अमलांतही आणला. कच्च्या आणि तयार केलेल्या लोकरीवर शेंकडा ८०, कथलावर शेंकडा १२०, चाकू, कात्र्या, सुऱ्या ह्या सामानावर अशीच भारी जकात लादली आहे त्यामुळें इंग्रज लोकांचें फार नुकसान झालें ह्मणून इंग्रज लोक अगदीं तडफडत आहेत. एकट्या शेफिल्ड शहरांतून दरसाल ३६००००० रुपये किमतीच्या चाकू, कात्र्या, आणि सुऱ्या अमेरिकेस जात असत. पण नव्या जबर जकातीनें ते पाठविण्यांत कवडीचाही नफा नाहीं. यामुळें कायकरावें अशा चिंतेंत व्यापारी पडले आहेत. बाहेरले जिन्नस आपल्या देशांत न आले ह्मणजे ते जिन्नस अमेरिकेंतील कारागिर आपोआप करतील असा ह्या जकाती वाढविण्यांत सरकारचा उद्देश फार चांगला आहे. कोणत्याही देशांतील धंदे कारागिरी, आणि कौशल्य वाढविण्यासाठीं बाहेरून येणाऱ्या मालावर जबर जकात बसविली पाहिजे ही गोष्ट अगदीं उघड आहे. रशिया, जर्मनी, वगैरे कित्येक देशांनीं अशा जकाती बसविल्यामुळें त्या त्या देशांतील धंद्यांची अतिशय भरभर झाली आहे. हिंदुस्थान परतंत्र असल्या मुळें त्यास तसें करण्याची सवड नाहीं ही खरोखर मोठ्या दुःखाची गोष्ट होय.

मोरीतल्या वायूनेंमृत्यु— मुंबई येथील रिपनरोडचा नाला साफ करण्यासाठीं तिघे मजूर आंत उतरले. आंतल्या रोग कारक वायूनें आपल्या शरीरास बाधा होते असें दोघांस समजलें, आणि तिसरा तर बेशुद्ध झाला. शेवट मोठ्या लगबगीनें त्यांस बाहेर काढून उपचार केले परंतु कांहीं उपयोग न होतां तो मरण पावला.

नागविष उतरण्याचा उपाय— बंगाल्यांत एका बाईस नागानें दंश केला. तिला सगळे उपचार केल्यावर शेवटीं एक शेतकरी पुढें झाला, आणि त्यानें कोंबड्याकडून विष ओढून घेण्याचा यत्न केला. सर्प चावल्या ठिकाणीं त्यानें कोंबडे धरले त्या बरोबर ते मेले या प्रमाणें ९ कोंबडीं ठार झालीं, दहावें अर्धे मेलें झालें, आणि ११ वें जगलें ह्या उपायानें बाईचें विष उतरून ती जगली.

गीर हें लोणी—आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर एक झाड होतें. त्याच्या बियांतील गीर अगदीं लोण्यासारखा असून लोण्याचे गुण त्याचे आंगीं असतात. शु. सू.

गेल्या २८ वे तारखेस म्हैसूर संस्थानचे पार्लमेंट उघडण्यांत आलें. या वेळीं या पार्लमेंट सभेंत २५० मेंबर हजर होते, तसेंच रेसिडेंट व कित्येक युरोपियनही हजर होते प्रथम दिवाणानीं चालू सालच्या खर्चाचा केलेला अंदाज वाचला व त्या वरून १० लाख रुपये शिल्लक राहील असा अदमास आहे. यंदा नवें रेल्वेचे फाटे व इरिगेशनचीं कामें करण्यांत येतील असें दिवाणांनीं बोलून दाखविलें. नंतर यापुढें १०० रुपयाहून जास्त जमीनधारा देणाऱ्या सर्व लोकांस निवडून मेंबर पाठविण्याचा हक्क महाराजांनीं दिला आहे असें दिवाणांनीं मोठ्या आनंद मुद्रेनें बोलून दाखविलें. सरतेशेवटीं महाराज व दिवाण यांच्या नावानें जयघोष होऊन सभा बरखास्त झाली. राष्ट्रीयसभेचें जें मागणें तें आमच्या एका संस्थानिकानें आपण होऊन दिलें असें वरील हकीकतींवरून होतें. हिंदुस्थानांतील लोक मूर्ख व त्यातील संस्थानिक महामूर्ख असें जें सांगण्यांत येतें त्यांत कितपत तथ्यांश आहे हें वरील उदाहरणावरून सहज समजेल. अशा त्या महामूर्ख संस्थानिकाकडून असले हक्क आह्मांस देण्यांत येत असून आह्मी खालसा प्रांतातील लोक ते हक्क मोठमाठाल्या सभा भरवून व राष्ट्रीय सभेसारख्या अती जोरदार सभेमार्फत आमच्या शहाण्या सरकाराजवळ हेंच मागणें मागत असून तें आह्मांस अजून मिळत नाहीं!

यंदाच्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष आपण व्हा असें राष्ट्रीयसभेकडून प्रसिद्ध मि० ग्लाडस्टन यांच्या चिरंजीवास आमंत्रणपत्र गेलें होतें पण त्यानीं तसें करण्याचें नाकारल्यामुळें आतां मद्रासचे सब्रह्मण आय्यार किंवा कलकत्याचे राजेंद्रलाल मित्र यापैकीं कोणी तरी होतील असा अदमास आहे. राष्ट्रीयसभेला कोठून किती मेंबर जावेत अशाबद्दल त्या त्या ठिकाणीं पत्रें गेलीं आहेत. व त्याप्रमाणें मुंबईच्या हद्दींत ह्मणजे ठाणें, कुलाबा, रत्नागिरी आणि कारवार मिळून २० मुखत्यार जाणार असून फक्त मुंबई शहरातून २ जागार.

इजिप्त प्रांतांत कलासा नावाचा एक लहानसा प्रांत आहे. हा प्रांत कोणाचा याची चवकशी करण्यासाठीं इतालींत तिच्या बड्या राजांचें एक कान्फरन्स भरलें होतें. इताली इंग्लंड व इजिप्तचा राजा असे हे तिघे राजे असून त्यांचा हा विचार १० दिवस चालूं होता पण सरतेशेवटीं त्याचा कांहींच निकाल न लागतां कान्फरन्स उठलें! या प्रकरणांत गंमत इतकीच आहे कीं, तो प्रांत दरवेशी लोकांच्या ताब्यांत आहे आणि हे तिघे त्रयस्थ खव्यांची वाटणी करणाऱ्या माकडा प्रमाणें आहेत. आणि त्या प्रांताच्या हक्काचा विचार करीत आहेत. युरोपांतील राष्ट्रें स्वहिता साठीं नीतिला किती झुगारून देतात हें या वरून सहज समजण्या सारखें आहे.

ज्या कित्येक जर्मन लोकांस विटू नांवाच्या प्रांतांत ठार मारण्यांत आलें त्यांस ठार मारणाऱ्या लोकांस तेथील सुलतानानें जर्मनीच्या स्वाधीन करण्याचें नाकारल्या वरून तेथील सुलतान व जर्मनी यांच्यांत लवकरच लढाई सुरू होईल आणि तेथील सुलतान लढाईची तयारी मोठ्या जारीनें करीत असून आपलें सैन्य एकत्र गोळा करीत आहे असें झांझिबारची ता. २४ आक्टोबर ची तार सांगते.

मुंबईस असलेले लष्करी हेडकार्टर्स् ता० ५ नोवेंबर पासून पुण्यास जाईल.

झांझिबार जवळ असलेल्या विटू नावाच्या प्रांतावर आड. मि. सर फ्रिमाटल यांणीं स्वारी करून जाळून टाकलें; असें झांझिबारची ता. २९ मिनहूची तार सांगते.

विटूच्या सुलतानास पकडून दिल्याबद्दल १०,००० रुपये इनाम देण्यांत येईल असें इंग्रज सरकारानें जाहीर केलें आहे.

लाहोराकडील सर्व खातें लवकर बंद करण्यांत येणार आहे व त्यांतील कामदारांस चाकरींतून काढून टाकण्यांत येईल अशा नोटिसाही करण्यांत आल्या आहेत. आमच्या इकडील हें खातें कधीं काळें करणार. ठा० अ०

म्याट्रीक्युलेशन परीक्षेस १७ नवंबर १८९० रोजीं सुरवात होणार. परीक्षक खाली लिहिल्याप्रमाणें नेमले आहेत.

इंग्लिशः— जे. आलिव्हर, जे. ए. रुपासल, आर. बी. रिटवर्ट, व ए० जे. एफ गार्डनर.

इतिहास भूगोलः— डब्ल्यू. ढाडरेट व फ्रामजी कावसजी बनाजी.

संस्कृतः— केशव हर्षद ध्रुव.

मराठीः— गोपाळ मोरेश्वर साठे.

पर्शियनः— रुस्तम मेहेरबान आगा.

गुजराथी— गोवर्धनराम माधवराम त्रिपथी.

कानडी— रामचंद्र हणमंत देशपांडे.

हिंदुस्थानीः— एस. एस. काद्री.

न्याचरल सायन्स— नानाभाई आरदेसर व एच. एफ. पागे.

गणितः— जमशेटजी आरदेसर दलाल कृष्णाजी बळवंत वागळे, विनायक नारायण लेले व जमशेटजी एदुलजी दारूवाला.

काश्मीरचे आसपास कोणत्या प्रकारचे कापड खपतें, याचा शोध करण्याकरितां एक रशियन व्यापारी तिकडे फिरत आहे. क० त०

टपालाची लूट— राजकोटाहून जोधपुरास जाणाऱ्या टपालावर चोरट्यांनीं धाड घातली. एकंदर तीनशे रुपयांचा ऐवज चोरीस गेला पोलीस चौकशी करित आहे.

उंदराची वृष्टी— इटली मधील केरो शहराचे आसपासचे भागावर उंदरांची वृष्टी झाली. एकेदिवशीं रात्रीं मोठें तुफान झालें आणि दुसऱ्या दिवशीं पहातात तों सर्वत्र मेलेले उंदीर पसरलेले दिसले.

दीड लाखाची मंजुरी— इराण पर्यंतच्या तारायंत्रांत कांहीं नादुरुस्ती झाल्यावरून हिंदुस्थान सरकारानें त्याच्या दुरुस्तीसाठीं दीड लख रुपये खर्चण्याची मंजूरी दिली. ज० नि०

प्रचंड मच्छ—विजय दुर्गाजवळ गेल्या आठवड्यांत सुमोर ५० हात लांबीचा व २० हात वेढीचा एक वेलमासा खाडी किनाऱ्यास लागला होता. तो फोडून पाहण्यांत आला परंतु आंत कांहीं मिळालें नाहीं.

सन १८८९ च्या ७ व्या आक्टाप्रमाणें मयताचे येणें असलेलें कर्ज वसूल करण्याबद्दल वारसीचे सर्टिफिकेट घेण्याचें काम आज पर्यंत फक्त डिस्ट्रीक्ट जज्ज कोर्टातच चालत असे. परंतु हा अधिकार सर्व सबार्डिनेट जज्जांस दिल्याबद्दल गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाले आहे.

चमत्कार— हैद्राबादेस थोड्या दिवसांपूर्वीं एक मुसलमान औरत प्रसूत झाली. तिला झालेला मुलगा जन्मास आल्यावर खोलीच्या कोपऱ्यांत जाऊन बसला. त्यान कडे आईची दृष्टी जातांच ती मरण पावली. बापाला हें कळल्यावर त्यानें येऊन मुलाला हातीं घेतलें, परंतु त्याच्या हातांतून तो जमिनीवर पडून त्याचा कपाळमोक्ष झाला व तोही मरणपावला. दुसऱ्या दिवशीं त्या मायलेकरांस मूठ माती देण्यांत आली, अशी विलक्षण हकीकत 'लोक मित्र' नामक गुजराथी पत्राचे तेथील बातमीदारानें लिहिली आहे.

हैद्राबाद— येथील तिजोरींत कांहीं अफरातफर झाल्याबद्दल तेथील माजि डेपुटी अकौंटट जयराव यांस १० वर्षे कैदेची शिक्षा झाली असें डे० टाइ० वरून समजतें.

मुत्रा (बायव्यप्रांत) येथील दोन डेपुटी माजिस्त्रेटांस गेल्या आठवड्यांत आरोपीनीं जोडे मारले.

औरंगाबाद येथील एका तरूण ब्राह्मणानें मुसलमानी धर्म स्वीकारला, त्या संबंधानें जातीनें त्याला बहिष्कृत करून त्याच्या १० वर्षे उमरीच्या अल्पवई स्त्रीचे वपन करून तिला विधवा केली, अशी चमत्कारीक हकीकत इंग्लिश पत्रांतून प्रसिद्ध झाली आहे!

निजाम साहेबास गेल्या २५ व्या तारखेस द्वितीय पुत्र रत्नाची प्राप्ति झाली त्या वेळीं आनंद प्रीत्यर्थ ११ कैद्यांची मुक्तता करण्यांत आली. स० शो०

विलक्षण प्रकार—ओशानिया बेटांत एलारी केली जवळ एक खेडें आहे, तेथें एक मनुष्य राहत असतो त्याचें वय १८ वर्षांचे आहे. त्याच्या आंगात असें कांहीं कसब आहे कीं, कोणाचें नांक बेढब असलें, किंवा एखाद्याच्या हाताला बोटच नसलें, अथवा अशा प्रकारची कोणती ही शारिरीक कुरुपता अथवा उणीव असली तर ती तो केवळ बाह्य कृतीनेंच साफ करतो. तो आपले पाय, त्या रोग्यांचे पायाला लावतो, व जेथें अंगवैकल्प असेल त्या लागावर आपल्या हातानें अशीं कांहीं चमत्कारिक कृती करतो कीं तो भाग ताबडतोब साफ होतो. व याकामीं तो बक्षीस मुळींच घेत नाहीं ह्मणून तो तिकडे मोठाच लोकप्रिय झाला आहे.

चमत्कारिक घड्याळ—अमेरिकेंत एका गृहस्थानें आपल्या घरीं एक घड्याळ लावून ठेवलें आहे. त्याला चावी देण्याची मुळींच गरज लागत नाहीं. घराचें दार उघडलें कीं घड्याळ चालू होतें. व दार बंद झालें, कीं तें बंद होतें. वेळ ठेवण्या पलीकडे ही याचा उपयोग होतो. दिवाबत्ती लावणें, मालवणें जेवण्याचे वेळीं घंटा वाजविणें वगैरे कामें ही तेंच करतें. न्या० सु०

## अकोलें बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥।= |
| " १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥। |
| सुवर्ण.... | २२ | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ८६। | उडीद | ६५ |
| गहूं काठे | ६० | बनशी | ६७॥ |
| जवारी | ३८ | चणे | ६५ |
| सर्की | ४८= | मीठ | ४८≡ |
| तूप | ७॥ | तेल | ४॥।= |

सध्याचे भाव

| | | |
|---|---|---|
| जवारी वसंत संवत | १९४७ | ४२॥। |
| गहू वैशाखशुद्ध | १९४७ | ५७॥= |
| आळशी चैत्रशुद्ध | १९४७ | ७९॥= |
| रुई फाल्गुन शु. | १९४७ | ५७॥- |
| सर्की व. नवें सालाची | १९४७ | ३॥।- |

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचाराची किंमत आ०
वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०।३
सहामाही ३ " " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस .........०१

SUBSCRIPTION
Rs.
per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly...........3 " 8 as
Single copy........................4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10...4as
Repetition per line3as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXIV — AKOLA MONDAY NOVEMBER 24 1890 — NO 45

वर्ष २४ — अकोला सोमवार तारीख २४ माहे नोव्हेंबर सन १८९० इ० — अंक ४५

वामन गोपाळ यांचा अनेक औषधं मिश्रित

## सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, ( गरमी ) व तिजपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिराबर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुंवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरें औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

## गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद ( मेंदू ) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा


## कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यात वरील वे औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गौतमराव केशव, मुंबई.

## सचित्रक्याटलाग



आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

## जाहिरात.

संस्थानसोंडूर जिल्हा बलारी इलाखा मद्रास येथें श्रीकार्तिक स्वामीचे महास्थान आहे. तेथें येत्या कार्तिक महिन्यांत शुद्ध पौर्णिमेस महायात्रा भरण आहे. तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोईकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकीटांचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शनटिकीट | २ |
| बारावर्षांचे आंतील मुलास दर्शनटिकिट | १ |

कार्तिक शुद्ध १३पासून तो कार्तिक शुद्ध १५ पावेतों श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर टिकीटे विकत मिळतील ब्राह्मणा वाचून इतर लोकांनी अभिषेक पादस्पर्श वगैरे ब्राह्मण द्वारा करवावें. तारीख १० माहे आक्टोबर सन १८९० इसवी.

सही

सही भीमराव पोळ म्यानेजर श्रीकार्तिक स्वामी देवस्थान संस्थान सोंडूर जिल्हा बलारी.

नोटिशीचें उत्तर.

नोटीस नं० रामभट बिन कृष्णभट सकनकरे राहणार अकोलें यांस खालीं सही करणार यानकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं तुह्मी दिलेली नोटिस खोटी आहे. विनाकारण आह्मांस खर्चात घातल्या बद्दलची नुकसान व नोटिशीचा खर्च भरून घेतला जाईल कळावें. ता० १७-११-९० ( सही )

गोविंद गंगाराम वैष्णव राहणार अकोलें

## जाहिरात.

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकिट मिळण्याविषयीं अथवा अज्ञानाचें पालन व त्याच्या माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्याविषयीं सन १८५८ चा अक्ट ४० कलम ६ प्रमाणें

अर्जाचा नंबर. कि. क्लास नंबर १३

मि. नंबर ६ सन १८९०

स्पे० अ० कमिशनरॆं साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार शंकर वल्द हरी अ० पा० करणार मातोश्री सेगाई मर्द हरी राहणार वडगांव तालुका अकोट.

वरील ( अज्ञान ) शंकर बापाचें नांव हरी जात राहणार वडगांव तालुके अकोट जिल्हा अकोला याचें पालन व माल मिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून अर्ज दिला आहे यास्तव मृत्युपत्राचे आधार किंवा दस्तायवजावरून किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचें कारणावरून किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहु अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं यांणी ता० ५ माहे दिसेंबर सन १८९० इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी तारीख १७ माहे नोवेंबर सन १८९० इ०

Maniksha Rattanji

स्पे० अ० कमिशनर.

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन वद्य १३ शके १८१२.

## सिंव्हावलोकन.

( ४२ अंकावरून पुढें चालूं. )

इतर अगांतुक विषय व दिपवाळीची सुटी ह्यांनीं ' सिंव्हावलोकनास ' बरेंच मागें टाकिलें. सांप्रतकाळीं हयात असलेल्या सर्व सुधारणांचीहकीकत देऊन सरळ मार्ग दाखवून देण्याचा प्रयत्न वर्तमान पत्रद्वारें करणें फार कठीण आहे, हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. एकतर ज्या विषयावर मोठमोठे ग्रंथ लिहिले गेले आहेत त्या सर्व विषयांचें विवेचन फार कलम न आडवितां झालें पाहिजे, दुसरें, जितका ' पुढें चालू ' न ह्मणण्याचा प्रसंग येईल तितका बरा हें लक्षांत वागविलें पाहिजे. आणि तिसरें, कसाही विषय गहन असला तरी त्यांतच टक्कदारपणा ठेवण्याची व थोड्या शद्वांत पुष्कळ अर्थाचा समावेश होईल अशी खबरदारी ठेवण्याची व्यवस्था ठेवणें जरूर आहे. बरें इतकी ही अवधानें सांभाळून काम भागतें असेंही नाहीं वाचणारांचीं मनें न दुखवितां सामोपचाराच्या गोष्टी सांगून त्यांस न रुचणाऱ्या विषयांच्या महत्वाचा ठसा त्यांच्या मनावर उठवून देऊन वाचनाची अभिरुची त्यांस लागावी व आपला सुमार्ग दाखविण्याचा कार्य भाग हा उरकिला जावा हें मुख्य अवधान सांभाळिलें पाहिजे. असो राजकीय सुधारणा व तिचीं उपांगें व्यापार आणि कला कुशलता त्याचप्रमाणें नोकरी व शेती ह्यांचे यथा तथा दिगदर्शन मार्गे करण्यांत आलेंच आहे व राजकीय चळवळींत तनमनधन अर्पण करून व्यापार व कला कौशल्याकडे दुर्लक्ष करण्यापासून स्वातंत्र्याची व धनाची हानी कशी होणार आहे ह्याचा विचार करण्याची फार अवश्यकता आहे हें वाचकांस समजावून देण्याचा प्रयत्न झालाच आहे. नोकरीची आवड व शेतीची अवस्था ह्यापासून उद्भवणाऱ्या भावी निकट संकटापासून काय सुटून जाण्याचा प्रयत्न आतांपासून सुरू ठेवण्याची विनंती आहे. व सुधारकांस तो विनयपूर्वक करण्यांत येणें इष्ट आहे आतां सामाजिक व तिलाच चिकटून असलेली धार्मिक ह्या सुधारणांकडे वळलें पाहिजे. कारण हें ' सिंव्हावलोकन ' कंटाळवाणें न होईल अशी व्यवस्था ठेवण्यांत येणें फार हित वह आहे.

सामाजिक सुधारणा जितकी महत्वाची आहे तितकीच ती घडवून आणणें फार निकट काम आहे. इंग्लिश लोकांच्या सहवासापासून ह्मणजे आज कमीतकमी ५०-६० वर्षांपासून आमच्या समाजाच्या हजारोवर्षांच्या जुन्या इमारतीवर त्या लोकांच्या विद्या व रीतरिवाजरूपी कुदळफावडेरूपी हत्याराचा भडिमार सुरू झाला. ह्या काळाच्या अगोदर शेंकडों वर्षें ह्या भव्य इमारतीवर पुष्कळ मारा बसलेला आहे परंतु तो मारा तांत्रिक व वरवर असल्या कारणानें थोडी पडझड मात्र झाली होती व इमारत जुनी झाल्या कारणानें ती जरी फार मजबूत बांधिलेली होती तरी तिचा बराच भाग पडलेला होता त्यापैकीं कांहीं भाग तसाच पडून राहिला व कांहींची ह्या शतकामांतील सुधारणाप्रिय गवंड्याकडून डागडुजी करण्यांत आली. त्यापैकीं कांहींजणांनीं आपलीं कामें बेमालूम बजाविलीं व त्या इमारतीस शोभा आणिली व कांहीं जणांनीं आपल्या कामांत हयगय करून अगोदरच मोडकळीस आलेल्या ह्या जुनाट समाजरुपी इमारतींत बेढबपणा कायमचा राखिला आहे व पूर्व स्वरूप अगदीं बदलून टाकिलें आहे. आलीकडील भडीमार बरीक सदोदित टिकणारा आहे व लोकांचें जर ह्या इमारतीकडे दुर्लक्ष राहील तर ती कधींना कधीं तरी कोसळून जमीनदोस्त होईल अशी भिती उत्पन्न झाली आहे व तींत तथ्यांशही बराच आहे. सुदैवानें आ

मचे लोक ही गोष्ट विसरत नाहींत व आपल्या समाजाच्या अस्थित्वाबद्दल विशेष कांहींतरी प्रयत्न केले पाहिजेत असें त्यांच्या मनांत पूर्ण भिनून गेलें आहे. ही मोठ्या आनंदाची गोष्ट समजली पाहिजे. आतां कोणत्या प्रकारचें चलन देणें वाजवी होणार आहे व तें चलन देण्यास कोणत्या उपायांची योजना झाली पाहिजे ह्मणजे लोकप्रिय सुखावह व जगाच्या रहाटीस अनुसरून आपल्या समाजाची स्थिति कायमची बनविण्यांत येईल ह्याविषयींच काय तो वाद राहिला आहे.

आमच्या समाजाच्या ज्या कांहीं त्याज्य अशा चाली सांप्रत आह्मांस दिसत आहेत त्यापैकीं विधवावपन, बालविवाह व पुनर्विवाह मनाई ह्या मुख्य आहेत ह्या चाली बंद करण्याचें प्रयत्न आमच्या सुधारकांकडून व परकीया कडून सारखे सुरू आहेत. परंतु त्यास यावें तसें यश अजून येत नाहीं विद्याविभूषित असतां व राजबळ पूर्ण अनकूळ असतांही आमच्या सुधारकांनीं हताश होऊन निराशेनें सरकारच्या तोंडाकडे पाहावें ही मोठी चमत्कारिक गोष्ट खरी. किंवा दिशाभूल होऊन योग्य उपायांची योजना न होतां भलतेंच उपाय योजण्यांत आल्या कारणानें असा परिणाम झाला ह्यांत कांहीं नवल नाहीं. इतिहासावरून असें दिसून येतें कीं, समाजाच्या अथवा धर्माच्या परंपरा चालूं असलेल्या रचनेंत फेरफार होण्यास कांहीं विशेष कारणें घडून आलीं पाहिजेत व ती रचना बदलविणारे साधारण मनुष्यापेक्षां कांहीं तरी प्रशंसनीय गुणांनीं मंडित असले पाहिजेत, त्या खेरीज जन समुहावर दाब बसून त्यांच्याकडून हुडांशी खिळलेल्या रीतीरिवाजांत फरक पडणार नाहीं. आमचे सुधारणेच्छु सुधारक साधारण लोकांच्याच मालिकेंत गोवण्यालायक असल्या कारणानें व बऱ्याचशा दुर्गुणाचा साठा त्यांच्यापाशीं कायम असल्याकारणानें त्यांच्या इच्छेनुरूप गोष्टी घडून येण्यास अडथळे येतात. आपल्या समाजांत लांछानस्पद व विनाकारण त्रासदायक असलेले प्रकार समूळ नाहींसे होतील तर बरें असें वाटू लागतांच तीस चाळीस वर्षा मागें जुनें तितकें गचाळ ह्मणून जी त्या वेळच्या सुधारकांनीं एकच गर्दी उसळून दिली तीच गर्दी सध्यां समाजाचें पाऊल पुढें पाडण्यास अडथळा आणूं पहात आहे; कारण अनुभवा अंती जुन्यांत दिसणारा गचाळपणा आतां तसाच कायम राहिला नाहीं. जुन्यांत ही कित्ता घेण्यासारखे गुण आहेत व नव्या सुधारकांनीं उचलिलेल्या पंथांत बरेंच टाकाऊ आहेत अशी लोकांची खात्री होत चालली व विद्वान लोकांच्या कांसेला धरून चालणें हा जो सर्वांस सामान्य मार्ग त्या मार्गाचें अवलंबन करण्यास लोक कांकूं करूं लागलें व पुरातन व्यवहारास एकाएकी सोडून देण्याचें धाडस त्यांच्यानें होईनासें झालें. कारण नवीन मार्गाच्या चांगुलपणाची हमी भरणाऱ्या सुधारकांचे जुन्याच्या वाईटपणाचे आक्षेप ढिलें पडत चालले. (पुढें चालूं)

## सन १८८९-९० सालाचा शाळा खात्याचा रिपोर्ट.

साभार प्रमाणें रिपोर्टाची एक नक्कल आमेच कडेस आली आहे त्याजबद्दल अलिशान रेसिडेन्ट साहेबांचे आम्ही फार आभारी आहों. या वर्षाची सालीम कारकीर्द मि. ब्यारट साहेबांची आहे व रिपोर्टही त्यानींच तयार केला आहे. एकंदर सर्व रिपोर्टाचे मे. डायरक्टर साहेबानीं दहाभाग केले आहेत व शेवटीं जमाखर्चाचें व मुलांच्या व शाळांच्या संबंधीं व्यवस्थेशीर टिपणें दिलीं आहेत गुदस्त सालापेक्षां या वर्षी मुलांच्या ४९ व मुलीच्या ३ शाळा वाढल्या. त्याच प्रमाणें गुदस्ता पेक्षां यावर्षी १२२९ मुलें व ६६ मुली शाळेंत वाढल्या. ही वाढीची संख्या जरी दिसण्यांत थोडी आहे तरी प्रमाणानें बरीच मोठी आहे व या वरून दिवसें दिवस शिक्षणाकडेस लोकांचें विशेष लक्ष जात आहे असें दिसून येत आहे. या वर्षीच्या जमाखर्चाचा जो आकडा दिला आहे. त्यांत बराच घोटाळा झाला आहे असें दिसतें. मे. कमिशनर साहेब ह्मणतात कीं यावर्षीचें शाळा खात्याचें उत्पन्न १०६५३ रुपयांनीं कमी झालें. व तेंच अलिशान रेसिडेंट साहेबांच्या शेऱ्या वरून पाहतां १०६९६३ रु० कमी असावें असें दिसतें. या पैकीं कोणता तरी एक आकडा चुकीचा असावा यांत कांहीं संशय नाहीं. या वर्षीचें उत्पन्न कमी होण्याचें कारण मे. कमिशनर साहेब व अलीशान रेसिडेंट साहेब यांनीं अनुक्रमें "स्कूलपट्टी असें दिलें आहे. कीं याचा वसूल जमा करण्याची एक वेगळीच तऱ्हा आहे" व "शाळाखात्याच्या उत्पन्नाचे जमेचे आंकडे नक्की मे. डायरक्टर साहेबांस कन्ट्रोलर कडून कळाले नाहींत" ह्मणून यावर्षी उत्पन्न कमी दिसत आहे. परंतु मि. ब्यारिट साहेब असें ह्मणतात कीं स्कूलपट्टी यंदा बरीच कमी वसूल झाली. परंतु जमा खर्चाचे जे आकडे दिले आहेत त्यावरून ह्या सर्व टिका व्यर्थच दिसतात. या वर्षीचें उत्पन्न ४४९२१४-१०-६ व गतवर्षीचें उत्पन्न ४२८२६६-११-० असें दाखविलें आहे. त्याच प्रमाणें स्कूलपट्टीचें गतवर्षीचें उत्पन्न १०२९८७६-५ पै होतें तें यंदां १०४७३२-२-९ झालें असें दाखविलें आहे. मग चूक कुठें असेल ती खरी. एकंदरींत कांहीं तरी घोटाळा आहे खरा.

कित्येक म्युनिसिपालिट्यांनींही या वर्षी शाळा खात्या कडे कमी पैसे दिले आहेत. तीन ठिकाणीं तर अजिबाद कांहींच दिले नाहीं व अकोलें व अकोट येथील म्युनिसिपालट्यांनी बरेच अंशीं कमी पैसा दिला आहे. अकोल्यास पाणी आणण्या करितां इतर सर्व खर्चाच्या बाबतींत काटकसर चालू आहे ही गोष्ट खरी आहे तरी एका फायद्या कडे पाहून बाकीच्या गोष्टिकडे दुर्लक्ष करणें बरोबर नाहीं सार्वजनीक मदतही यावर्षी बरीच कमी मिळालेली आहे. व मे. कमिशनर साहेब व अलीशान रेसिडेन्ट साहेब असें ह्मणतात कीं ह्या वर्गण्या वसूल करण्या कडे तहशिलदार लोकांची मदत घेऊं नये. एका तऱ्हेनें पाहिले असतां हें ह्मणणें रास्त आहे. परंतु तहशिलदार लोक ह्या अशा वर्गण्या कांहीं आपले व जन खर्च करून किंवा जोर जबरीनें वसूल करित असतील असें आम्हांस वाटत नाहीं. आपल्या मुलाच्या शिक्षणा करितां पैसे द्या ह्मणून चांगल्या हुशार व अनुभवशीर अशा तहशिलदारांनीं आपल्या तालुक्यांतील लोकांस चांगलें तऱ्हेनें सांगितलें असतां कांहीं वावगें होणार नाहीं.

आपल्या ताब्यांतील शाळा कडे कांहीं म्युनिसीपाल कमेट्या चांगलें लक्ष्य देत आहेत हें पाहून फार आनंद वाटतो. उमरावतीच्या म्यु. क. च्या संबधानें तेथील एजुकेशनल इंचेजे शेरे आहेत ते तेथील कमेटीस फार भूषणास्पद आहेत परंतु कित्येकठिकाणीं ह्याकडे मेंबर लोकांचें लक्ष्य कमी आहे असें दिसून येत आहे. मे. डायरेक्टर साहेब असें लिहितात कीं शाळांची परीक्षा चालू असतां कित्येक कमेटींतील लोक खुशाल वर्तमानपत्रें वाचीत असतात, व परीक्षेच्या कामाकडे कांहींच लक्ष्य देत नाहींत. परंतु ही अशी स्थिती असणें अगदीं बरोबर नाहीं. या कडे सर्व लोक लक्ष्य देतील.

स्त्रीशिक्षणाकडे दिवसें दिवस लोकांचें विशेष लक्ष्य लागत चाललें आहे हें पाहून फार आनंद वाटतो, सहाव्या यत्तेच्या परीक्षेला गुदस्त सालीं एकही मुलगी नव्हती तेंच या वर्षी त्या यत्तेत ७ मुली पसार झाल्या, केळीवेळी येथील मास्तरीण बाई मुलीना शाळेंतील अभ्यास शिकवून शिवाय स्वंयपाक वगैरेचे प्रपंचांत लागणाऱ्या इतर गोष्टीचें शिक्षण देत आहे इतर ठिकाणींही त्या प्रमाणें क्रम सुरु झाल्यास बरें होईल व स्त्रीशिक्षणास बरेंच उत्तेजन मिळेल असें आम्हीं समजतों. स्त्रीशिक्षणाचा पसार होणें बरेंच अंशीं मुलींच्या शिक्षकावर अवलंबून आहे. व ही जबाबदारी त्यांनीं चांगली बजवावी अशी त्यांनां आमची प्रार्थना आहे. मुलांच्या कसरती कडेही यावर्षी बरेंच लक्ष्य देण्यांत आलें आहे व कवाईत वगैरे शिकविणें व त्याबद्दल बक्षिस देणें सुरुझालें आहे. एकंदरीत पाहतां शाळाखात्याची दिवसें दिवस सुधारणा होत चालली आहे यांत कांहीं संशय नाहीं.

मागील अ. पुढें चालूं

केवळ शरीर दृष्टयाच ही चाल हानीकारक आहे असें नाहीं तर दुसऱ्या इतर बऱ्याच गोष्टी हिजवर अवलंबून आहेत. मनुष्य किती ही सदृढ शरीराचा व धीराचा असला तरी त्याला उत्तम कळकळीची सहचारी असल्या शिवाय चालत नाहीं. प्रसिद्ध तत्ववेत्ता चार्लस डार्विन याच्या चरित्रा वरून असें दिसून येईल कीं तो नेहमी आजारी असतांहीं त्यानीं जीं महत्कृत्यें केलीं तीं केवळ त्याच्या प्रीयपत्नीच्या मदतीनें झाली असें ह्मटलें असतां चालेल. कोणा थोरपुरुषांचे चरित्र घ्या त्या वरून तुह्माला दिसून येईल कीं त्या सर्वांस कोणातरी बुद्धीमती स्त्रिचें साह्य मिळाल्या शिवाय झालें नाहीं. परंतु जेथें स्त्री वयानें नवऱ्यापेक्षां लहान असून तिच्या मानसिकशक्ती अगदी विकास पावल्या नाहींत तेथें तिनें नवऱ्यास साह्य तरी कसें करावें? तुह्मापैकीं सर्व सुशिक्षीत लोकांस आपल्यांत व आपल्या स्त्रीत किती अंतर आहे व त्यामुळें आपणांस काय अडचणी येतात याचा बहुतेक अनुभव येऊन चुकला आहे ह्या अडचणी दूरकरण्याची तुमची इच्छाही आहे. मनुष्य चांगला सुशिक्षीत झाल्यावर त्याला स्त्रिच्या साहचर्याची व तिच्या प्रेमोत्साहाची जरूरी वाटावी व ती न मिळाल्या मुळें त्याचा उत्साह नाहींसा होऊन त्याला अगदीं निराश्रित झाल्या सारखे वाटावें हें साहाजिकच आहे. पुरुषावर नसाया स्थिती पासून अनिष्ट कारक परिणाम घडतो तसा स्त्रीवर घडत नसेल असें मानतां येत नाहीं. अल्लडपणानें मनमोकळें करून खेळण्याच्या दिवसांत, आपल्या मैत्रीणिला सोडून, व आईबापाच्या लडीवाळपणास अंतरून जिला परक्याचा घरीं आपले बालपणाचे दिवस कंठावे लागतात तिच्या मनाची काय स्थिती होत असेल याची नुसती कल्पना सुद्धा करता येत नाहीं; जो काळ बाल क्रिडा करण्यांत, किंवा पुस्तक पठणांत जावा तो सासरच्या माणसाच्या शुश्रूषेंत घालविणें जिच्या नशिबीं येत असेल तिची कशी त्रेधा उडत असेल हें शद्बांनीं सांगणें फार कठीण आहे! मुलीच्या नेणतेपणास अशा अशी जबाबदारीच्या कामानीं ती अगदी दडपून गेली असेल व तशांत ही आपलें सुखदुःख कोणास तिला सांगतां येऊं नये व मनातल्या मनांत झुरुन तिनें आपल्या आयुष्याचें दिवस मोजित राहावें याहून अधिक शोचनीय स्थिती दुसरी असेल असें मला वाटत नाहीं. पुरुषास घरात न करमलें तर बाहेर जाऊन आपली वाटेल त्या रीतीनें करमणूक करून घेतायाची परंतु स्त्रीस मात्र आपल्या कंटाळवाण्या झाडण सारवणा वाचून आपल्या दुखाःचा विसर पाडण्यास दुसरें कोणतेंही साधन मिळूं नये हें अगदीं क्रूर व अनितीचें काम होय.

या बालविवाहापासून स्वयंवराच्या पद्धतीस किती बाध येतो व त्यापासून किती अनिष्ट परिणाम होतात हेंही दाखविणें अगदीं जरूर आहे. केवळ कुलशील, व पैसा पाहून चार लोकांनीं वधुवरांची सांगड घालून देण्यापेक्षां परस्पर प्रेमभावानें उभयताची सांगड बनल्यास विशेष सुखावह होणार नाहीं काय? व अशा प्रेमानें बद्ध झालेल्या स्त्रीपुरुषांत विशेष कळकळ राहून परस्परास अधिक साह्य मिळून हा संसारगाडा अधिक सुरळींत चालणार नाहीं काय? ज्या देशांनीं ह्या दोन्हीही चालीचा उपभोग घेतला आहे त्यांचें मतें स्वयंवर या चालीपासून होणारी प्रजा अधिक बुद्धीमान, नीतीमान, व शक्तिमान असतें असें ठरलें आहे. इंग्रज लोक आज जे सर्व राष्ट्रांपेक्षां, बुद्धीनें शौर्यानें व नीतीनें पुढें आहेत त्याला बरेंच अंशी त्यांच्यातली स्वयंवर पद्धति कारण आहे व हिंदुलोकांचा दिवसें दिवस प्रत्येक बाबतींत मागें पाऊल जात आहे त्यालाही पण बरेंच अंशी ही दुष्ट चाल घातुक आहे असें ह्मणणें भाग आहे तुमच्या पूर्वजांनीं ही स्वयंवर पद्धती चालविली होती परंतु तुह्मी मात्र तिचा ऱ्हास केला इंग्लंडांतील स्त्रिया हिंदु स्त्रियापेक्षां बऱ्या स्थितींत आहेत यांचे ही कारण हेंच होय एरवीं हिंदु पुरुषापेक्षां इंग्लिश लोक स्त्रियांस अधिक हक्क देण्यास किंवा त्यांच्याशीं न्यायानें वागण्यास अगदीं एका पायावर तयार आहेत असे नाहीं. परंतु आपल्या कल्याणाकडे लक्ष्य देऊन जी ही त्यांनीं स्वयंवर पद्धति चालू ठेविली ती जर ठेविली नसती तर आज इंग्रज स्वातंत्र्य आहे व जो त्यांचा मान आहे तो कधींच राहिला नसता.

विवाहविधी हा केवळ पशुवत विष[illegible]नातृत्व करण्या पुरताच नसून केवळ प्रेम बंधनाचा पाया होय. व हें प्रेम एक वेळेच

नाहींसें झालें कीं तुमचो जन्मभर नासाडो व्हावयाचोच. तर सभ्य हो मो तुम्हास हात जोडु विनंती करतें कीं या सर्व गोष्टोचा विचार करा व या पुढें तुम्ही हा भयंकर चाल न सोडाल तर तुमची स्थिती कधीं सुधरणार नाहीं व आणखो कित्येक युगेंच्या युगें तुम्हांस लोकांचे दास रहावें लागेल.


ADVERTISEMENT.

There is a vacancy in the Akola Municipal office of the post of Head clerk salary Rs 30 for two years. Preference will be given to candidates who possessing a good knowledge of English and Marathi have experience of office account work and English correspondence. Candidates should apply to the undersigned before 15th December 1890.

Dated Akola 20-11-90. Md. Husain Secretary A. M. C.



# The Berar Samachar

MONDAY, NOVEMBER 24 1890


## REPORT ON PUBLIC INSTRUCTION IN BERAR.

The report on public instruction in the Hyderabad Assigned Districts for the past year 1889-90 has just been published, and we are thankful to the Resident for a copy of it. The report deals with the educational progress in Berar for the year 1889-90, and it gives interesting information in a detailed manner of the intellectual development of the province. At the beginning of the Report is published Mr. Plowden's letter to the Secretary for Berar, giving a general review of the Directors Report, which is prepared by Mr. Barrett of the Bombay Educational Department who acted as the officiating Director during the absence of Rao Bahadur Jatar is divided into ten parts, and at the end are given appendices full of valuable statistics as to the schools and scholars, expenditure, results of prescribed examinations and the distribution Local Fund and Municipal expenditure. The number of schools for boys is increased by 49 and for girls by 3. The number of boys attending schools has been increased by 1239 and the number of girls attending schools has increased by 66, thus there has been in the year under review an increase of institutions and the scholars both male and female, and though this increase is small, still it is significant in as much as it shows a gratifying tendency on the part of the public to avail of benefits of education. The income of the Educational Department is given as quite different figures by the three officers, and one is at a loss to find the actual cost of the education in the year 1889-90. The Commissioner mentions that there has been in the educational income a decrease of Rs. 10653; while the Resident's order mentions that the decrease was Rs. 106563 )?), which appears like an error in printing. The remarks that the decrease is "principally owing to the much smaller amount of collections on account of educational cess fund shown this year," while the Commissioner observes that the decrease is due apparently to some different plan of crediting receipts from the educational cess, "and the Resident hints that the decrease was felt by the Director, because the figures of the actual credit to the department from the educational cess were not communicated by the Comptroller to the Director, but that the total income of the Department really amounted to Rs 4,45,214 10-6 as against Rs, 428266-11 in the year 1888-89, and the receipts from the educational cess rose from Rs 102587-6 5 to Rs. 104782-2-9. These figures and their explanations differently stated by different authorities represent at any rate the confusion in respect to a very important factor of the educational department: and we can only hope that a similar chaotic state will not be repeated on the next occasion and we shall find in the next year's report uncontradicted and correct figures and items of income of this most important branch of the Government— the public instruction. Municipal contributions towards public education have fallen, three municipalities having diminished their contributions. The Akola and Akot Municipalities have reduced their contributions, because the one is husbanding its resources for water works, and the other for a drainage scheme. We must however, say that this policy of reduction on the part of our municipalities is a doubtful policy, and is not likely to meet with the public approval. Though we are not in a position to say if the municipalities would not have been able to save from other branches of expenditure instead of reducing their education al contributions, yet we must confess to a feeling of surprise and regret to find this unstatesman-like tendency in our municipalities. Popular contributions have also fallen; and the Commissioner and the Resident remark that Tahsildars should not be asked to use their influence to collect subscriptions for educational purposes— a mode suggested by the Wun Deputy Educational Inspector. We agree with the Commissioner and the Resident that 'asking for subscription is a delicate question, but we do not think that a Tahsildar is apt to use improper pressure. If a cautious method be devised as to how the Tahsildar should proceed in this matter and if only tried and experienced Tahsildars be asked to advise people to subscribe for their children's education, we see no danger from such a course. We are glad to find that municipal Committees are evincing interest in the education of people entrusted to their charge. In this respect the Amraoti Municipal Committee stands pretty high, and it is hoped other munical committees will follow its example. The remarks of the Deputy Educational Inspector about the Amraoti Municipal Committee are highly gratifying, and it deserves the thanks of the public for its services. Some of committees are still backward and they have not shown as much interest in the schools committed to their care as they ought to have done. The instance mentioned by the Director with respect to the curious conduct of some of the members of a Committee reading news papers while the school was being examined by the Director, is really deplorable and we hope thot they would in future show "better taste and more sense" Female education is making a fair progress in the Province. All the Deputy Educational Inspectors speak very hopefully of female education in their districts. In the year 1888 89 no girl had appeared for the sixth standard, whereas in the year 1889 90 seven girls have passed in the sixth standard. It is gratifying to find that in the girls' school at Keliweli the mistress teaches cookery in addition to usual subjects. We earnestly recommend that the same system should be followed in all the girls' schools as far as possible. We are sure that this new feature in the girls' school will attract a larger number of girls to schools, and will go a long way to make female education popular among the people. Physical training of the boys is also paid more attention to in the year under report. The Director observes that "during the past year physical training has received a considerable impulse; drilling has been brought into general use and a scheme for the allotment of prizes for proficiency in gymnastics has been sanctioned." On the whole the year 1889-90 has shown continued progress in educational and intellectual development of the province, and the Department deservee to be congratulated upon the good work it has been able to achieve.

## MR. HUME "ON THE PEOPLE'S CAUSE."

(Continued from our last issue.)

No man well outside the classes, and fully three-fourths of the voters in these burghs are this, can possibly, it seems to me, vote for a Tory except under one of three conditions. He may be ignorant of the fundamental difference between the two parties. In this case, you, his more enlightened brethren, have to teach him better and make him realise that in voting for a Tory he is voting against his own people, against his own interests, against those of all his kith and kin, all near and dear to him; that he is flinging away the inheritance won for him by clearer-sighted forefathers, and signing away the birthright of his children!

But, people are so short-sighted, so blind, they often do not know which is their own side, which is their opponent's who are their friends, and who their adversaries. This sort of blundering is always happening, not only in politics but, in actual warfare, and as I speak a little incident rises before my mind which will serve to illustrate happily the position of *our* shortsighted folks.

It was late in the afternoon of the 4th July, 1857, in the very centre and heat of the great Indian mutiny, on the eve of the sanguinary. Battle of Agra, when the bugles sounded and out we turned two guns of the 23 rd Light Field Battery, some five companies of the 3rd Bengal Fusiliers, and a handful of Volunteer Horse. Shots were ringing in the distance, and it became known that the Kotah Contingent, a native auxiliary force officered by Europeans, which was to have joined us next day in an attack on a large body of mutineers who lay a few miles south of us, had themselves mutinied and were shooting their European officers. So, off we went, men, horses and guns, as quickly as we could in the direction of their camp, and as we proceed ed officer after officer of the Contingent joined us. Some of the mutineers disliked their Quartermaster-Sergeant and so killed him, but though they shot vigorously at their officers, they bore them no grudge and did not wish to kill them, only to give them as it were a delicate hint that their company was no longer required, a hint which after much vain expostulation our brave fellows, six or eight amongst a thousand, were obliged to take, and so when we reached their camp—on the road immediately in front of which lay the poor sergeant on his face, a little dark streak wending ominously from under his head over the white kunker—all the officers but one were safe with us; only one, Stack, Lieutenant he then was, I dare say if alive he is a General now, was missing, and thanking that he might have been carried off by the mutineers and killed by the way we followed up the line of their retreat, hoping to recover his body. Very soon, however, we caught sight of the man himself riding down towards us at a smart pace, and when by dint of shouting, and riding towards him we did attract his attention, he condescended to join us at a slow canter. Then it appeared, that when the mutiny occurred— it was only the infantry of the Contingent who fired— he, being at the other end of the line, and being very short sighted, and finding all his men, the cavalry, in line, put himself at their head, supposing from the shooting that the mutineers were attacking the camp, and giving the word, charged off with all his men in the direction of the main rebel camp. Thus, in consequence of his short sightedness, he could not distinguish between friends and foes, and put himself at the head of men who had mutinied against the authority of our beloved Queen and actually went away with them to join the enemy.

(To be continued).

To

Yeotmall 19-11-90

The Editor of Berar Samachar

Sir

Although Yeotmall is a small town it boasts of having criket and lawntenuies clubs which are scarely to be seen amongst natives in any other place in Berar except Amraoti. The real credit for the introduction of these plays in this place is chiefly due to their energetic and popular leaders messrs L. C. Baput and Bhagwat. Although this small station seems to be happy in some respects, it feels mostly the disadvantage of being far away from a Railway sta tion however the introduction of the mail Tanga has caused a great convenience to passengers.

The journey between Yeotmal and Dhamangaon Railway station though sometimes tedious was never thought to be dangerous as the traffic between these two places is almost incessant. But a recent occurance of dacoity on the Mail Tanga has made it rather unsafe to travel by night at least for sometime to come if the dacoits are not found out and severely dealt with.

Early on the 14 th instant at about 4 oclock as usual the Mail Tanga started from Dhamungaon with two passengers and a driver besides Mail. No sooner it had gone over a distance of about 3 miles than it was suddenly attacked by 4 strong men who had hidden themselves in a ditch along the road side with latties in their hands. As it was quite dark at the time it was difficult to recognize them. But it was certain that they were either Rohillas or Pur Bhaias. Their first attack was upon the ponies and the driver who received severe blows. The ponies turned round to Dhamangaon side and were on the point of running when one of the dacoits went in front of Tanga and stopped it. Now one of the passengers Mr. E. I. Peters got down and made an advance upon the man who stopped the Tanga Mr. E. I. Peters is a robust and strong man. He is an excellant hunter and a cricketeer His father was in the military service and he himself is a sergeant in the volunteer corpse. But they being four and he alone without any weapon; the one Latti which he received made him run away. He at once went to the nearest village Nargavandi where he could not obtain any assistance. Now it was the turn of the remaining passenger Mr. V. R. gore. When saheb bolted away what could you expect from a present Bramin? The poor fellow however received injuries on his hand and thigh. The first dish served to him made him quite submissive moreover he was deprived of his two gold rings weighing 2 Tolas and 3 Rs. in cash and was left almost naked After the men were deallt with the dacoits laid their hands on the mail bags. They tore them open and took away 2 insured parcels. How much they were worth is not yet known. The place where the above thing happened is in the Amraoti District the police of that district I hope will not be lacking in their energy to trace out the theft.

Your's (S)

( पुरवणी पहा )

उशिरां लग्न करणें शरीर प्रकृतीस हितावह आहे असें मुंबईच्या इन्शुअरन्स कंपनीचे म्यानेजर मि. स्लेटर यांणीं प्रसिद्ध केलें आहे.

फ्रान्स देशांत १८६६२०२ इतक्या बायका आज्युएट आहेत. आमच्या इकडे 'पुरुष आज्य एटच शखवाद्य करीत आहेत मग आणखी बायका कशाला?

सरकारी जंगलांत नियमित मुदतींत कोणीही शिकार करूं नये असें मद्रास सरकार लवकरच ठरावानें प्रसिद्ध करणार आहे.

झोब नावाच्या डोंगराळ प्रांतांत आमच्या सरकारानें लढाई सुरू केली असून हल्लीं तिकडे शिरानीन नावाचे नवेच लोक सरकारा विरुद्ध उठले असून ते पूर्वींच्या बंडखोरांस जाऊन मिळत आहेत.

बुखाऱ्यास एक प्रकारचा सांथीचा ताप उत्पन्न झाला आहे असें तिकडून आलेला एक व्यापारी ह्मणतो

हिंदुस्थानांत येऊन ज्या व्यापारी कंपनीनें राज्य कमावलें तशाच मासल्याची एक कंपनी हल्लीं आफ्रिकेंत गेली आहे या कंपनीचा आफ्रिकेंत थाबिलीस नांवाच्या लोकांनीं नुकताच पराभव केला आहे असें ह्मणतात.

मध्य प्रांताचे कमिशनर मि. म्याकंझी यास ब्रह्मदेशाचे कमिशनर नेमण्यांत येणार असून त्यांच्या जागीं मि. म्याकडोनेल यांची नेमणूक होईल असें ह्मणतात.

हिंदुस्थान सरकारचे मिलेटरी सेक्रेटरी मे० जनरल कोलन यांणी रजा घेतली आहे.

बंगालचे ले० गव्हर्नर सर कालविन हे अलाहाबादेस ता० ४ मिनहूरोजीं येऊन दाखल झाले.

इंग्लिश राज्यामध्यें व्यापारी आगबोटी ७६०२ आहेत; आणि शिवाय ९६६८ गलबतें आहेत. ठा० अ०

क्षयरोग हटकून बरा करणारा देवीच्या तोडग्या सारखा एक तोडगा कोक नांवाच्या एका जर्मन डाक्टरानें काढला आहे.

दंगा— ब्रह्मदेशांत काचीन्स लोकांनीं दंगा केला आहे. तेथील अधिकाऱ्यांचे मदतीस रंगून येथून लष्करी, पोलीस रवाना होत आहेत.

पुणें येथें येत्या जानेवारींत मोठी कवाईत होणार आहे.

डेक्कनब्यांक— या नांवाची एक नवीन संस्था पुण्यांत स्थापन करण्याचा विचार चालू आहे. दक्षीणेंतील लोकांना आपले पैसे ब्यांके प्रमाणें ठेवण्यास नेटीव मंडळीनीं काढलेल्या पेढीची सोय नव्हती ती उणीव दूर व्हावी, ह्मणून ही संस्था उत्पन्न केली असल्याचें प्रसिद्धि पत्रांत लिहिलें आहे. पेढीचें भांडवल २२॥ लाखांचे ठरविलें आहे, व प्रत्येकभाग १०० रु० चा ठेवला आहे. या पेढीचे डायरेक्टर्स खा. ब. दोराबजी पदमजी, रा० सा. कुपुस्वामि मुदलीयार श्री० रा० चिंतामण विश्वनाथ नातु, गोविंद महादेव गद्रे व रा० ब० नारायणभाई दांडेकर असे आहेत.

भविष्य — येत्या दिसेंबरच्या १८ व्या व १९ व्या तारखेस एक मोठा धूमकेतु ( शेंडे नक्षत्र ) पूर्वेस उदय पावेल, व ३ दिवसांनीं महासागरांत जाऊन पडेल. त्या नंतर फार पाऊस पडून समुद्र किनाऱ्यावर राहणारे लोकांस ह्यानें मोठें संकट प्राप्त होईल, असें मद्रासेंतील कांहीं हिंदु ज्योतिष्यांनीं भविष्य केलें आहे. पहावें काय होतें तें.

हिंदुस्थानांत रशियन आगबोटी — मद्रास कलकत्ता व कालंबो ह्या बंदरांत आगबोटीनें व्यापार करणारी एक रशियन कंपनी स्थापन होत आहे. एवढेंच नव्हते.

एका स्कूलमास्तरानें शाळेंतील एका विद्यार्थ्याच्या तोंडांत त्यानें दुर्भाषण केल्याबद्दल साबण कोंबला त्यामुळें तो मुलगा मरण पावला; ह्मणून त्याच्या बापानें सदरहू मास्तरावर फिर्याद केली आहे. असें वां. ग्या. वरून समजतें मास्तराला ह्या शिक्षा सुचतात तरी कशा?

हिंदुस्थानांत तयार झालेलें कापड घ्यावयाचें नाहीं असा चिनी व्यापाऱ्यांनीं कडक निग्रह केल्याचें आडव्होकेटास आलेली हांगकांग येथील तार सांगते.

विद्युद्रथ — लंडनापासून स्टाकवेल पर्यंत जमिनी खालुन जाणारी विजेची आगगाडी युवराज प्रिन्स आफवेल्स यांच्या हातें तारीख ४ नवंबर रोजीं सुरू करण्यांत आली

रशियाचे बादशाहाचे उभयतां चिरंजिव ता० ४ रोजीं सेंटपिटर्स बर्ग येथून पृथ्वि प्रदक्षिणेस निघाले. ह्या महिन्याचे अखेरीस मुंबईस येऊन दाखल होतील. तेथून पुणे व औरंगाबाद येथें जातील. एलोरा व अजिंठा येथील कोरीव लेणीं पाहतील आणि तेथून मुंबईस परत येऊन पुढें रजपुतान्यांतील संस्थानें पाहात पाहात उत्तर हिंदुस्थानांत जातील. काशी, प्रयाग हीं पाहून ते कलकत्त्यास जातील, आणि तेथून आगबोटींत बसून मद्रास व लंका पाहून पुढें चिनांत जातील असें प्रसिद्ध झालें आहे.

हिंदुस्थानांतून जाणाऱ्या कापसामध्यें बरीच मिसळ होत असल्याबद्दल जो बोभाट झाला होता त्यावरून असें आतां ठरविण्यांत आलें आहे. कीं जो खराब कापूस निघेल तो सहामहिन्याच्या आंत परत पाठवावा.

सरचार्लेस एलिअट यांस बंगालचे ले० गव्ह० नेमिलें

लढाऊ जहाज जळालें—महाराणी सरकारचें सर्पेंट नांवाचें लढाऊ जाहाज गेल्या सोमवारीं केपफिनिस्टर जवळ वादळांत खडकावर आपटून फुटलें व २७० मनुष्यें प्राणास मुकलीं असें ता० १३ ची लंडनची तार सांगतें

हैद्राबाद — सरकारी पैशाचा स्वाहाकार केल्याबद्दल दुसरा एक खटला तारीख १८ रोजीं कमिशन पुढें चालणार आहे. त्यांत नबाब नमदजंग बहादुर असकरी कमिशनर व राजे श्रीनिवासराव बहादूर डेपु० कमिशनर हे दोन आरोपी आहेत. त्यांचे तर्फे काम चालविण्यास मद्रासचे प्रसिद्ध बारिस्टर मि. नार्टन व मुंबईचे लार्ड क्यांबेल हे बारिस्टर जाणार आहेत. थोरले सरसालरजंग यांचे इष्टेटींतून दरसाल २४ हजार रुपये लेडी सालरजंग ह्यांस देण्याचें निझाम सरकारानें ठरविलें आहे.

युरोपियन दंपत्याचा तमाशा — सिलोन ( लंका ) येथें मि० झिगन नांवाच्या युरोपियनाच्या तोंडावर त्याच्या मडम साहेबांनीं ग्लास मारिलें, ह्मणून नवऱ्यानें माजि० वरून तिला वारंट काढलें. वारंट बजावण्यास पोलीस गेलें असतां ही बाई स्वतः हत्यारबंद होऊन बसली व तिनें "आंत याल तर गोळी घालून मारीन, याद धरा" असें सांगितलें ह्या भीतिमुळें पोलीस निघून गेले पुढें ती शुद्धीवर येऊन स्वाधीन झाली व तिजवर गेल्या ११ व्या तारखेस खटला चालणार होता, असें सिलोन टाइ० त लिहिलें आहे.

सिंव रेल्वेवर कच स्टेशनांत कांहीं पेशावरी पठाण शिरून त्यांणीं ३ खून केले व रोकड शिलक व रेल्वेच्या टिकिटांची १ पेटी पळवून नेली असें कळतें. स० शो०

कलकत्त्यास एक तंबाखूचा मोठा कारखाना काढण्याचा कांहीं लोकांचा विचार आहे. त्या कंपनीचें भांडवल सुमारें ७ लक्षाचें आहे.

पुढच्या वर्षीं कांहीं बंगाली ख्रिया कांग्रेसच्या खटपटी साठीं विलायतेस जाणार असें समजतें.

पहिल्या सर सालरजंगाच्या बायकोस निजामसरकारानीं महिन्याचें २००० रु. पेनशन देण्याचें कबूल केलें.

गव्हाचा व्यापार अमेरिकेंत फारच झपाट्यानें वाढत चालला आहे. १८८० सालीं अमेरिकेंतून ३८ कोट रुपयांचा गहूं बाह्य प्रदेशांत रवाना करण्यांत आला.

यंदा अमेरिकेंत ८० लक्ष कापसाच्या गांठ्याचे इतकें कापसाचें पीक येईल असा अजमास आहे.

यंदाच्या कांग्रेस करितां जागा एडिंबोली गार्डन्समध्यें घेण्याचें ठरलें असें समजतें.

हैद्राबाद येथें पंडित शंभोनाथ यांनें जें रक्तपितीवर उत्तम औषध ह्मणून शोधून काढलें आहे त्याचा कांहीं रोग्यांना इतका उत्तम गूण आला कीं त्याचा अनुभव पाहण्यासाठीं लेप्रसी कमिशन तेथें जाणार आहे.

सु० प०

सन १८८८—८९ सालाच्या सरकारी रिपोर्टांत पुढील माहिती मिळते. या सालीं हिंदुस्थानांत कापसाच्या गिरण्या १०८, तागाच्या गिरण्या २९, कागदाच्या गिरण्या ९, तांदुळाच्या गिरण्या ४७, लांकडें वगैरे करवतण्याचे कारखाने ४७, लोखंड व पितळ यांचे कारखाने ४७, रेशमाचे कारखाने ७, काफीचे कारखाने २६, आणि साखरेचे कारखाने ९ होते. शाळा पाठशाळां मधून शिकत असलेल्या एकंदर विद्यार्थ्यांची संख्या २९४४२६७ होती विद्यार्थिणींची संख्या २९०२६१ होती. एकंदर ५ युनिव्हार्सिटीज असून त्यांच्या ताब्यांतील १२४ कालेजांमध्यें १३९४१ अंडर ग्रॅजुएट शिकत होते. त्यांत ७६ स्त्रिया अंडर ग्रॅजुएट होत्या. या सर्व कालेजांतून गतसालीं १३६६ आर्ट्स व साएन्सच्या पदव्या मिळविलेले ग्रॅजुएट्स बाहेर पडले. ह्याशिवाय २९९ वकील, ८३ डाक्टर, आणि ३० इंजिनीअर बाहेर पडले. न्या. सिं.

---

नोटीशिचें उत्तर

टिकमदास सुंदरलाल दुकान अकोलें यांस

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुम्हीतारीख ८-११-९० ची नोटीस दिली ती पावली. तुमचें ह्मणणें खोटे असून आम्हांस तुमचें कांहीं देणें नाहीं. तुमचे लबाडीचे नोटीशिबद्दल आम्हांस उत्तर द्यावें लागलें याचा खर्च आम्हांकडे पावतां करावा. कळावें. तारीख १९-११-९० इसवी

सही

अब्दुलहुसेन अल्लाबक्स कोंठे वाले दस्तुर खुद.

---

नाटीस.

नोटीस बेशमी भानीबाई मर्द चुनुसिंग लहरिये राहणार काळा मारुतीजवळ मुक्काम अकोलें जिल्हे मजकूर. तुमचे नोटिशीचा जबाब देणार खुशालसिंग हुलशीराम लहरिये मुक्काम अकोलें. तुम्ही इलिचपुराहून जी नोटीस दिली होती ती आह्मांस पावली त्यांत तुह्मी जो मजकुर लिहिला तो सगळा गैरशिस्त आहे. जितका मजकूर तुमचे नोटिशींत आहे तितका सर्व खोटा आहे. तुमचे भावाचे अदावतीमुळें तुह्मी आह्मांस नोटीस दिली. तुमचे बंधुशीं आह्मांशी टिकाराम आमचा चुलता आहे त्याशीं तुमचे भावाशी पूर्वींच भांडण झालें होतें. त्या अदावतीमुळें तुह्मी आमचे अब्रूची हानी केली. दुसरे तुम्ही पुष्कळ दिवस तुमचे भावाचे घरी होता हें सर्वांना ठाऊक आहे. तुम्ही आपले बंधूचे घरून गेलात हें आम्हांस कांहींच ठाऊक नाहीं. अदावतीनें तुम्ही अम्हांस विनाकारण बदलाम करित आहां. तुमच्यानें आमचें कांहींच होत नाहीं. तुमचे घराची चाल काय आहे कशी आहे हें सर्व जातीवाल्याना ठाऊक आहे. तुम्ही कोणते वर्तणूकीचे मनुष्य आहा हे सर्वांना माहीतच आहे. तुमचा आमचा अर्थाअर्थी कांहींच संबंध राहिला नाहीं. रीतीप्रमाणें इजतीचा जबाब घेणार आहों. कळावें ता० १२-११-९०

( सही )

खुशाल वल्लद हुलशीराम लहरिये रहाणार अकोलें दस्तुरखुद्द

---

नोटीस.

सा० खेमजी पुनशी भाटे वाणी रहाणार ताजनापठ यांस खालीं सही करणार यांजकडून असें कळविलें जातें कीं तुह्मी तारीख २७ अक्टोबर सन १८९० मित्ती आश्विन शुद्ध पौर्णिमा रोजीं बारदानाचा सौदा पक्के ९४० दर पन्नयास भाव १०४०६ प्रमाणें ठरवून त्या बद्दल उभयतांचे करारनामे एकमेकांनीं एकमेकास करून दिले. सदर्हु सौद्या प्रमाणें तुह्मी बारदान आपले पसून लागलीच मोजून घ्यायाचे. त्याप्रमाणें आह्मी बारदान मोजून देण्यास तयार आहों. व आज पंधरा दिवस झाले बारदान मोजून घ्या ह्मणून सांगत आहों. परंतु तुह्मी घेत नाहीं. आह्माजवळ आज पैसे नाहींत; व पैसे जमल्यावर मोजून घेऊं व तोंपर्यंत व्याज देऊं वगैरे गोष्टी तुह्मी सांगत आहा. याज करितां या नोटिशीनें असें कळविलें जातें कीं तीन दिवसाचे आंत सदर्हु बारदान मोजून घेऊन रक्कम रु० १२०४०६ आम्हांस देऊन सदर्हु सौद्याचा निकाल करावा. असें न केल्यास सदर्हु बारदान आम्ही आजचे बाजारभावानें विकून त्यांत नफा आल्यास तुमचे नांवानें जमा करून ठेऊं. तोटा आल्यास तुम्हावर रीती प्रमाणें फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत या नोटिशीचे खर्च सुद्धां नुकशान भरून घेतले जाईल, म्हणून दिली नोटीस कळावें तारीख १९-११-९० इसवी.

सही

सा० विरम देवजि भाटे वणी.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.